रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २८३
www.ramprahar.com
गुरुवार, १ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

‘स्वच्छतेसाठी प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे’/२
खालापूर हत्याकांडातील आरोपीस अटक/७
तळाघर येथे जिल्हा कबड्डी स्पर्धेत मेढेखार संघाची बाजी/८

## ‘प्रगत, संपन्न महाराष्ट्र साकारण्यासाठी कटिबद्ध होऊया’



**मुंबई :** महाराष्ट्र देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असून, आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून, सहकार्यातून आणखी प्रगत, संपन्न महाराष्ट्र साकारण्यासाठी कटिबद्ध होऊया, असे आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, महाराष्ट्राची स्थापना ज्यांच्या बलिदानातून सत्यात आली त्या सर्व हुतात्म्यांना विनम्र आदरांजली अर्पण करतो. महाराष्ट्राने गेल्या ६५ वर्षात उद्योग, शिक्षण, आरोग्य, कृषी, कला, क्रीडा, साहित्य, सामाजिक न्याय अशा अनेक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे. येत्या काळात महाराष्ट्र हे देशातीलच नाही तर जगातील प्रगत राज्य असेल हा आपला संकल्प आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले आहे.

# देशात जातनिहाय जनगणना होणार

## केंद्र सरकारचा मोठा निर्णय



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यतेखाली बुधवारी (दि.३०) सुपर कॅबिनेट बैठक झाली. या बैठकीत काही महत्त्वाचे मंत्री उपस्थित होते. या बैठकीत जातनिहाय जनगणनेसह अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषद घेत सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली तसेच यापुढील जनगणनेत जातींचीही गणना केली जाईल, असे सांगितले.

केंद्रीय मंत्रिमंडळाची समिती म्हणजेच सीसीपीएला ’सुपर कॅबिनेट’ म्हणून ओळखले जाते. या केंद्रीय मंत्रिमंडळात उच्चपदस्थ मंत्र्यांचा समावेश असतो. सीसीपीएच्या सध्याच्या सदस्यांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा समावेश आहे. ते अध्यक्ष आहेत. यासोबतच संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, अर्थमंत्री निर्मला सीतारमण आणि वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांचाही समावेश आहे.

अश्विनी वैष्णव यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, केंद्र सरकारने शिलाँग आणि सिलचरदरम्यान नवीन महामार्ग बांधण्यास मंजुरी दिली आहे, ज्याचा एकूण खर्च २२ हजार ८६४ कोटी असेल. **(पान २ वर..)**





**पनवेल : पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात वीरगती प्राप्त झालेले नवीन पनवेलमधील दिलीप देसले यांच्या कुटुंबियांना राज्य शासनाच्या वतीने जाहीर केलेल्या आर्थिक मदतीपैकी सध्या पाच लाखांचा धनादेश बुधवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते देसले कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यात आला. या वेळी तहसीलदार विजय पाटील, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांच्यासह देसले कुटुंबीय उपस्थित होते.**

**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील हर्बेरिया शुष्क वनस्पतीच्या साठ्याची न्यूयॉर्क बॉटनिकल गार्डनच्या डेटाबेसमध्ये नोंद करण्यात आली आहे. या विशेष यशाबद्दल ‘रयत’चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले. या वेळी प्राचार्य डॉ. ए. एन. चांदोरे, उपप्राचार्य प्रा. एस. ई. सैंदनशिव, डॉ. एस. जी. मेंगाळ, प्रा. एस. आर. व्हंडे व डी. के. आहेर उपस्थित होते.** (वृत्त पान २ वर..)



## मोरबे धरणात बुडून एकाचा मृत्यू

**चौक : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील सुकापूर भगतवाडी येथे राहणाऱ्या २० वर्षीय अनिकेत किसन भगत या तरुणाचा मोरबे धरणात बुडून मृत्यू झाला आहे. अनिकेत पिल्ले कॉलेज रसायनी येथे शिक्षण घेत होता.

परीक्षा संपल्यावर मित्रांसोबत मोरबे धरणाच्या परिसरात आला. सर्व मित्र पाण्याबाहेर असताना पोहण्यासाठी तो पाण्यात उतरला, काही अंतर गेल्यावर त्याची दमछाक झाली आणि त्यातच तो बुडून मृत्यू झाला. त्याच्या मित्रांनी ही माहिती खालापूर पोलीस व अपघातग्रस्त मदत टीमला मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले. पोहून आणि बोटीने पाण्यात तपास केल्यावर मृतदेह सापडला. अनिकेतचा मृतदेह वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

## आजपासून खारघरमध्ये रंगणार भाजप सांस्कृतिक महोत्सव

### मनोरंजन, इतिहास, कलेचा संगम; विविध भागातील मिसळची लज्जत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून ’भाजप सांस्कृतिक महोत्सव’ गुरुवार १ मेपासून चार दिवस खारघर मधील सेक्टर १२ येथील गावदेवी मैदानावर रंगणार असून या महोत्सवाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. या महोत्सवात मनोरंजन, इतिहास, कला तसेच महाराष्ट्राच्या विविध भागातील मिसळ महोत्सवाचा संगम पहायला मिळणार आहे.

खारघर भाजप आयोजित या महोत्सवात गुरुवार १ मे रोजी सायंकाळी ६ वाजता ९० कलाकारांच्या संचासह ’महाराष्ट्राची महासंस्कृती’ कार्यक्रम होईल. यात आपल्या राज्याच्या विविध सांस्कृतिक परंपरा आणि शिवराज्याभिषेक सोहळ्याचे भव्य सादरीकरण होणार आहे. शुक्रवार २ मे रोजी सायंकाळी ६ वाजता खारघर आणि पनवेल परिसरातील विविध संस्थांचा सांस्कृतिक कलाविष्कार, **(पान २ वर..)**

# महाराष्ट्र दिनी पंतप्रधान मोदी मुंबई दौऱ्यावर

### वेव्हज परिषदेचे करणार उद्घाटन


**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी (दि.१) महाराष्ट्र दिनी मुंबई दौऱ्यावर आहेत. मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे भारतातील पहिल्या जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषदेचे (वेव्हज २०२५) उद्घाटन करतील. कनेक्टिंग क्रिएटर्स, कनेक्टिंग कंट्रीज या घोषवाक्याने प्रेरित १ ते ४ मे दरम्यान या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये जगभरातील निर्माते, स्टार्टअप्स, उद्योजक आणि धोरणकर्ते एकत्र येणार आहेत, अशी माहिती पंतप्रधान कार्यालयाने दिली आहे. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव देखील या उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित असतील.

देशाचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी सर्जनशीलता, तंत्रज्ञान आणि प्रतिभेचा वापर करणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनानुसार, चित्रपट, ओटीटी, गेमिंग, कॉमिक्स, डिजिटल माध्यम, एआय, प्रसारण आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान वेव्हज परिषदेमध्ये एका व्यासपीठावर असेल. यामुळे भारताच्या माध्यम आणि मनोरंजन कौशल्याचे व्यापक प्रदर्शन होईल. २०२९ पर्यंत ५० अब्ज डॉलर्सची मनोरंजन बाजारपेठ तयार करणे हे वेव्हजचे उद्दिष्ट आहे, ज्यामुळे जागतिक मनोरंजन अर्थव्यवस्थेत भारताचा ठसा उमटेल.







# स्वच्छतेसाठी प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे -मंत्री गुलाबराव पाटील

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यातील ग्रामीण भागात वैयक्तिक स्वच्छतेसोबतच शाश्वत सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे तसेच गावात दृश्यमान शाश्वत स्वच्छता राखणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामीण भागातील स्वच्छतेला अधिक गतीमान करण्यासाठी लोकसहभागावर भर दिला आहे. सार्वजनिक व घरगुती स्तरावरील घनकचऱ्याचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. त्याचा एक भाग म्हणून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत 'कंपोस्ट खड्डा भरु, आपलं गाव स्वच्छ ठेऊ' या मोहिमेची ग्रामीण भागात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. ही मोहीम १ मे ते १५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ, बचतगट, युवक यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावा, असे आवाहन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे.

राज्यातील सर्व गावांमध्ये स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा- २ अंतर्गत वैयक्तिक शौचालय व सार्वजनिक शौचालयांसह घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, मैलागाळ व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन, गोबरधन या घटकांची कामे प्रगतीपथावर आहेत. राज्याच्या ग्रामीण भागात स्वच्छतेची लोकचळवळ उभी राहिल्यास या कामांना अधिक गती प्राप्त होईल. सर्व गावे हागणदारीमुक्त अधिक मॉडेल म्हणून घोषित करून संपूर्ण राज्य हागणदारीमुक्त अधिक मॉडेल करण्याचा शासनाचा संकल्प आहे.

गावांची संपूर्ण स्वच्छता करण्याबरोबरच ग्रामीण भागातील सर्व गावांना दृश्यमान स्वच्छतेचा अपेक्षित दर्जा मिळवून ग्रामीण जनतेत स्वच्छतेविषयक वर्तणूकीत बदल घडवून आणणे, सेंद्रीय कचऱ्याचे व्यवस्थापन करून वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच शाश्वत सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे. घनकचरा व्यवस्थापनात सुधारणा व पर्यावरणपूरक उपाययोजना करण्यासाठी कचरा कमी करणे, पुनर्वापर करणे. यावर भर देणे.

अभियान कालावधी ०१ मे २०२५ ते १५ सप्टेंबर २०२५ असा असून याचा आरंभ महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून उद्या दि. १ मे रोजी करण्यात येणार आहे.गावातून कचरा जमा करून नाडेप भरण्याचा कालावधी १ मे ते १० मे २०२५ असा आहे.

प्रक्रिया, देखभाल व पडताळणी कालावधी ११ मे २०२५ ते ३१ ऑगस्ट २०२५ असा आहे.नाडेप खड्डा उपसणे दि. ०१ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५ असा आहे.

राज्यात या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता ग्रामस्थांप्रमाणे लोकप्रतिनिधी यांचाही सक्रिय सहभाग असणार आहे. सर्व जिल्ह्याचे पालकमंत्री, राज्यसभा सदस्य, लोकसभा सदस्य, विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य, सरपंच यांना पाणीपुरवठा मंत्री पाटील, यांनी पत्राद्वारे मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. संबंधित लोकप्रतिनिधी आपल्या मतदारसंघात जाऊन मोहिमेचा आरंभ करणार आहेत.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.), गटविकास अधिकारी, यांच्यावर मोहीम यशस्वी करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातील सर्व अधिकारी/ सल्लागार, विस्तार अधिकारी (सर्व), अन्य कर्मचारी, प्रत्येक ग्राम पंचायतीतील ग्राम सेवक, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, शिक्षक, ग्राम पंचायत स्तरावरील सर्व कर्मचारी तसेच ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक, सर्व महिला बचत गट यांचा सहभाग असेल.

## एमएस-सीआयटी कोर्समध्ये आता एआयचा समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळने आपला लोकप्रिय एमएससीआयटी कोर्स आता कृत्रिम बुद्धिमत्तेने सुसज्ज करत नव्याने सुरू केला आहे. गेल्या दोन दशकांपासून महाराष्ट्रासह देशभरात १ कोटी ६५ लाख हून अधिक विद्यार्थ्यांनी पूर्ण केलेल्या या कोर्समध्ये आता १०० हून अधिक ए आय टूल्स व ४०० पेक्षा अधिक कौशल्यांचा समावेश करण्यात आला आहे.

तंत्रज्ञान विभागून कमी होत असतानाच आता ए आय जाणणारे आणि न जाणणारे अशी नवी दरी तयार होत आहे. ही दरी भरून काढण्यासाठी एम के सी एल ने हा कोर्स नव्याने तयार केला आहे.

चॅट जिपीटी, गुगल जेमिनी, मायक्रोसॉफ्ट कोपॉयलट यांसारख्या टूल्सचा वापर, सायबर सुरक्षा, डेटा विश्लेषण, डिजिटल व्यवहार, आणि ए आय वापरून अभ्यासात किंवा कामात कशी मदत मिळवता येईल, याचे प्रशिक्षण या कोर्समध्ये दिले जात आहे.

राज्यातील साडेचार हजारहून अधिक अधिकृत केंद्रांमधून हा कोर्स शहरी आणि ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. संगणक साक्षरतेबरोबरच नवयुगातील तंत्रज्ञान कौशल्ये देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.




## शासकीय वसतीगृहात प्रवेशासंदर्भात आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रायगड यांचे अधिनस्त मागास वर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह अलिबाग, मागास वर्गीय व आर्थिक दृष्टया मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह अलिबाग, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह महाड, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह तळा, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह महाड, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह पनवेल,मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह पाली अशी एकूण ७ शासकीय वसतिगृह कार्यरत असून इच्छूक विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावेत असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण सुनिल जाधव यांनी केले आहे.

शासकीय वसतिगृहात गरीब, हुशार,होतकरु, मागासवर्गीय, आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. दि.१० मार्च २०२५ च्या शासन निर्णयानुसार अनु.जाती ८५ टक्के अनु.जमाती ३ टक्के, विमुक्त जाती, भटक्या जमाती ०५ टक्के, विशेष मागास प्रवर्ग ०२ टक्के, आर्थिकदृष्टया मागास ५ टक्के याप्रमाणे आरक्षण आहे.

वसतिगृह वैशिष्टये-मोफत निवास व भोजन व्यवस्था, शैक्षणिक अभ्यासक्रमानुसार लागणारी वहया, पुस्तके, शैक्षणिक व महाविद्यालयीन प्रवेशिततांकरिता लेखन साहित्या करिता रु.४०००/- शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता, दैनंदिन व वैयक्तिक खर्चाकरिता दरमहा रु.६००/-निर्वाह भत्ता जिल्हा पातळीवर व रु.५००/- निर्वाह भत्ता तालुका पातळीवर, शालेय/महा.शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना गणवेशाचे दोन संचाकरिता गणवेष भत्ता,प्रोजेक्ट रिपोर्ट/शै. सहलभत्ता,अॅप्रनभत्ता इ.

आवश्यक कागदपत्र:-.प्रवेशपात्र विद्यार्थ्याच्या पालकांचे सर्वमार्गानी मिळून वार्षिक उत्पन्न अनु. जाती, व जमाती विद्यार्थ्यांकरिता रु.२,५०,०००/-चे आत व विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्टया मागास, अनाथ व अपंग घटकातील विद्यार्थ्यांकरिता रु.१,५०,०००/- चे आंतअसावे, अर्जासोबत तहसिलदार यांचे सहीचा सन २०२४-२५मधील उत्पन्नाचा दाखला, जातीचे मुलकी अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्रक, बँक खात्याची झेरॉक्स, आधारकार्ड झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.

वसतिगृहात राहाणाऱ्या मुला-मुलींकरिता इ. ८ वी पासून पुढे मांग, भंगी, कातकरी व माडिया गोंडया जाती मधील मुलामुलींकरिता इ.५ वी पासून देण्यात येतो. विहित नमुन्यातील अर्ज वसतिगृहातवरील पत्यावर विनामूल्य उपलब्ध आहेत.

## माहिती उपसंचालक रवी गीते सेवानिवृत्त



**नवी मुंबई, : रामप्रहर वृत्त**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोकण विभागाचे माहिती उपसंचालक रवी गीते हे नियतवयोमानानुसार आज सेवानिवृत्त झाले. त्यांच्या चार दशकांच्या पत्रकारिता आणि शासकीय सेवेतील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यासाठी कोकण भवन, नवी मुंबई येथे एका छोटेखानी कार्यक्रमात निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष मनोज जालनावाला, ठाण्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, रायगडच्या जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे, सहायक संचालक संजिवनी जाधव-पाटील, उपसंपादक प्रविण डोंगरदिवे, तसेच कोकण विभागीय माहिती कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी आणि पत्रकार मित्र उपस्थित होते.

रवी गीते यांचा कारकीर्दीचा प्रारंभ नामवंत वृत्तपत्रांमधून झाला. 'लोकपत्र', 'नवराष्ट्र' आणि 'सामना' या प्रमुख दैनिकांत त्यांनी पत्रकार म्हणून कार्य केले. शासकीय सेवेत त्यांनी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रात सहायक संचालक या पदावरून प्रारंभ केला.

त्यानंतर चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये जिल्हा माहिती अधिकारी म्हणून काम करत असताना त्यांनी प्रशासन व प्रसारमाध्यमांमध्ये समन्वयाचा उत्तम आदर्श निर्माण केला. प्रामाणिक, मनापासूनची सेवा आणि जनसंपर्क कौशल्य हे गीते यांच्या कार्यशैलीचे विशेष पैलू होते.

या कार्यक्रमात त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या कार्यपद्धतीचे, मृदू वर्तनाचे आणि नेहमी मार्गदर्शक म्हणून दिलेल्या योगदानाचे कौतुक केले. उपस्थितांनी गीते हे 'आरोग्याबाबत जागरूक' 'तत्काळ निर्णय क्षमता' असणारे शासकीय अधिकारी अशी विविध विशेषणे देत मनोगते व्यक्त केली.

## महाराष्ट्र दिनानिमित्त वाशीत अक्षय्य महोत्सव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई प्रेस क्लब आणि टीमवर्क्स मीडिया सोल्युशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून येत्या १ मे रोजी अक्षय्य संगीत कला महोत्सव २०२५ चे आयोजन वाशीतील विष्णुदास भावे नाटयगृहात सायंकाळी ८ ते ११ या दरम्यान करण्यात आले आहे. या कला महोत्सवांतर्गत लोकसंगीत आणि लोककला यांवर आधारित महाराष्ट्राची लोकवारी या सांगितीक कार्यक्रमाचे सादरीकरण होणार आहे.

या कार्यक्रमामध्ये प्रसिद्ध लोककलाकार क्रिष्णाई उलेकर आणि त्यांचे सह कलाकार भारूड, गण, गौळण, छक्कड, पारंपरिक लावणी, दशावतार नृत्य, जाखडी इत्यादी नृत्य प्रकार आणि गायन प्रकार सादर करणार आहेत. लोककलेच्या रसिक प्रेक्षकांना महाराष्ट्र दिनी ही एक पर्वणीच असणार आहे. आपल्या काही लोप पावत चाललेल्या कलाकृती ह्या कार्यक्रमाद्वारे प्रेक्षकांसमोर आणण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे.

पूर्णत निशुल्क असलेल्या या कार्यक्रमास रसिकांनी आवर्जुन उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहिती करीता मनोज पाठक -९८९२०२५८५३ व महेश चव्हाण -९७०२९२४१८९ यांच्याशी संपर्क साधावा.

## 'सीकेटी'चे विवेक पाटील सेवानिवृत्त

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यरत असलेले शिक्षक विवेक नारायण पाटील यांच्या प्रदीर्घ आणि समर्पित सेवेचा बुधवारी सेवापूर्ती आणि सेवा गौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ उत्साहात संपन्न झाला.

चांगू काना ठाकूर विद्यालयात २६ वर्षे शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे महत्त्वपूर्ण कार्य केलेल्या विवेक पाटील यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या प्रदीर्घ सेवेत त्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यक्तिमत्व विकासासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या उत्कृष्ट आणि निष्ठावान सेवेबद्दल संस्थेच्यावतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या गौरव सोहळ्यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला. यावेळी बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. ते म्हणाले, विवेक पाटील यांनी आपल्या सेवेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जीवनात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांची कामाप्रती असलेली निष्ठा आणि समर्पण भाव निश्चितच अनुकरणीय आहे. त्यांनी केवळ विद्यार्थ्यांना शिकवले नाही, तर त्यांच्यावर चांगले संस्कारही केले आहेत असे सांगुन यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छाही दिल्या.

या कार्यक्रमाला संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉक्टर एस. टी. गडदे, सत्कारमूर्ती विवेक पाटील व त्यांच्या पत्नी सुहास पाटील यांनी आवर्जून उपस्थिती दर्शविली. याशिवाय, प्राचार्य कैलास सत्रे, प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक सुभाष मानकर, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, कैलास म्हात्रे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, वैशाली पारधी यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्थेचे कर्मचारी आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विवेक पाटील यांना शुभेच्छा दिल्या.



## पान १ वरुन

### देशात जातनिहाय जनगणना होणार

यासोबतच शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णयही घेण्यात आला आहे. २०२५-२६च्या ऊस हंगामासाठी शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ३५५ रुपये किमान आधारभूत किंमत (MSP) मंजूर करण्यात आली आहे.

पुढे ते म्हणाले, आज झालेल्या बैठकीत पुढील जनगणनेत जातीय जनगणनेचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे एक ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे. याचे कारण आतापर्यंत जातीय जनगणना मुलभूत जनगणनेचा भाग नव्हती. काही राज्यांनी त्यांच्या पातळीवर जातीसंबंधी सर्वेक्षण केले आहे, परंतु सामाजिक रचनेला समजून घेण्यासाठी एक समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे. सीसीपीएने निर्णय घेतला आहे की आता जातींची गणना पुढील जनगणनेत केली जाईल, कोणत्याही वेगळ्या सर्वेक्षणात नाही, अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे.

### आजपासून खारघरमध्ये रंगणार भाजप सांस्कृतिक महोत्सव

शनिवार ३ मे सायंकाळी ६ वाजता सुप्रसिद्ध गायिका मुग्धा वैशंपायन आणि गायक प्रथमेश लघाटे यांच्या सुमधुर गाण्यांची मैफिल तर रविवार ४ मे रोजी ग्रुप डान्स स्पर्धा होणार आहे.

या महोत्सवात चारही दिवस सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत कोल्हापूर, सातारा, वऱ्हाडी, नाशिक, मुंबई, पुणेरी चविष्ट मिसळचे स्टॉल्स असणारा मिसळ महोत्सव तसेच इतिहास प्रेमींसाठी शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रांचे भव्य प्रदर्शनही असणार आहे.

## मंदिराची भिंत कोसळून सात भाविकांचा अंत

**विशाखापट्टणम : वृत्तसंस्था**

आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणममध्ये मंगळवारी रात्री श्री वराह लक्ष्मी नरसिंह स्वामी मंदिराच्या भिंतीचा २० फूट लांबीचा भाग कोसळला. या अपघातात सात जणांचा मृत्यू झाला आणि चार जण जखमी झाले. मंदिरात चंदनोत्सव सुरू होता. दरवर्षी हा उत्सव साजरा केला जातो. येथे हजारो भाविक भगवान नरसिंहाच्या दर्शनासाठी येतात. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार मुसळधार पावसामुळे ही दुर्घटना घडली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अपघाताबद्दल शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधान म्हणाले, 'लोकांच्या मृत्यूच्या बातमीने मला खूप दुःख झाले आहे. जखमी लवकर बरे व्हावेत अशी मी इच्छा करतो.' पंतप्रधान मदत निधी मृतांच्या कुटुंबियांना दोन लाख आणि जखमींना ५०,००० ची मदत देईल.

## भाजपचे माजी आमदार रामदास आंबटकर यांचे निधन

**नागपूर : प्रतिनिधी**



विधानपरिषदेचे भाजप माजी आमदार डॉ. रामदास आंबटकर (वय ६४) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. चेन्नई येथील रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी अनेक वर्ष जुळले होते. ते विधान परिषदेचे सदस्य म्हणून वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत होते.

मागील काही दिवसांपासून ते किडनीच्या आजाराने ग्रस्त होते. त्यातच त्यांना न्युमोनियाचे निदान झाले. त्यांच्यावर अगोदर नागपुरातील एका खाजगी इस्पितळात उपचार सुरू होते व त्यानंतर त्यांना चेन्नई येथील महात्मा गांधी मेडिकल मिशन हेल्थकेअर सेंटर येथे त्यांना हलविण्यात आले होते. बुधवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

डॉ. आंबटकर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सिनेट तसेच व्यवस्थापन परिषद सदस्यदेखील होते. २००४ मध्ये त्यांनी राजकीय क्षेत्रात काम सुरू केले. २०१५ मध्ये त्यांना भाजप महाराष्ट्राचे सरचिटणीस बनवण्यात आले.

## मोखाड्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयास न्यूयॉर्क बॉटनिकल गार्डनकडून हर्बेरियम कोड प्राप्त

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील हर्बेरिया शुष्क वनस्पतीचा साठ्याची न्यूयॉर्क बॉटनिकल गार्डनच्या डेटाबेसमध्ये नोंद करण्यात आली आहे.

या हर्बेरियाच्या समावेश इंडेक्स हर्बेरियम या जागतिक हर्बेरियम निर्देशिकेत करण्यात आला असून याला 'रयत' असा कोड देण्यात आला आहे. रयत हा कोड रयत शिक्षण संस्थेच्या नावावरून देण्यात आला आहे. या हर्बेरिया मध्ये एकूण २६१३ हून अधिक वनस्पतीचे नमुने सुसंगत पद्धतीने संग्रहित करून जतन करण्यात आले आहेत.

यामध्ये दुर्मिळ, प्रादेशिक, प्रदेशनिष्ठ वनस्पतीचा समावेश करण्यात आला आहे. या हर्बेरियम मधील संकलित केलेले वनस्पतीचे नमुने महाराष्ट्रातील पश्चिम घाट आणि कोकण परिसरातील असून याचा उपयोग जैव-विविधता, संशोधन, वनविभाग तसेच शैक्षणिक दृष्टिकोनातून त्याचा उपयोग होईल. हर्बेरियाचे व्यवस्थापक म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अरुण निवृत्ती चांदोरे यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच त्यांचे संशोधन विद्यार्थी देविदास बोरुडे, निलेश माधव, अनुप पानसरे, परेश भालेकर व दशरथ राजपकर यांची नमुने गोळा करण्यासाठी मदत झाली. तसेच यासाठी महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुभाष सैंदनशिव आणि परमेश्वर कराळे व प्रशांत राऊत, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. एस.जी. मेंगाळ तसेच संशोधन विकास प्रमुख प्रा. एस.आर.व्हंडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या विशेष यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन अॅड. भगीरथ शिंदे यांनी याचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## महाराष्ट्र गौरव रथ मंगल कलश यात्रेचे माणगावात जंगी स्वागत

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवरती उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून प्रदेशाध्यक्ष खासदार. सुनील तटकरे तसेच महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या सूचनेनुसार महाराष्ट्र राज्यातील थोर संतांच्या, महापुरुषांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमिती माती कलशामध्ये भरून त्या मातेचे पवित्र जपण्यासाठी गौरव रथयात्राचे आयोजन करण्यात आले आहे. या रथ यात्रेचे २९ एप्रिल रोजी माणगावात जंगी स्वागत करण्यात आले.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, युवक जिल्हाध्यक्ष शादाब गैबी, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, तालुकाध्यक्ष काका नवगणे, महिला अध्यक्ष संगीता बक्कम, उणेगाव माजी सरपंच राजेंद्र शिर्के, शहराध्यक्ष नितीन वाढवळ, महिला शहराध्यक्ष योगिता चव्हाण, उपनगराध्यक्ष हर्षदा काळे, माजी नगरसेविका माधुरी मोरे, रवी मोरे, किशोरी हिरवे, माजी उपनगराध्यक्ष दिलीप जाधव, स्वीकृत नगरसेवक मनोज पवार, सिद्धांत देसाई, माजी सरपंच हुसेन रहाठविलकर, संगे आदी राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाहतूक नियम पाळण्याचे आवाहन

## कळंबोली वाहतूक शाखेतर्फे प्रबोधनासह जनजागृती

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरामध्ये अपघात वाढले असल्याने ते रोखण्यासाठी कळंबोली वाहतूक शाखेतर्फे वाहनचालक मालकांचे प्रबोधनासह जनजागृती उपक्रम सुरू केला आहे. त्या अंतर्गत विविध ठिकाणी वाहनचालकांना मार्गदर्शन केले जात आहे.



नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी (दि.३०) कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बानकर यांनी खांदेश्वर रेल्वे स्टेशन येथे रिक्षाचालक व प्रवासी यांना रस्ते अपघात कसे कमी करता येतील, वाहन चालकांनी वाहन चालवताना नशा न करणे, दुचाकी वाहन चालवताना हेल्मेट वापरा, फोर व्हीलर चालकांनी शीट बेल्ट वापरा, रिक्षा चालकांनी एक्सेस पॅसेंजर न भरणे, प्रॉपर युनिफॉर्म परिधान करणे, रिक्षाचालकांनी प्रवाशाची सौजन्याने वागणे, रिक्षा चालकांनी महिला प्रवासी लहान मुले तसेच वृद्धांना सहकार्य करणे इत्यादी गोष्टींची माहिती देऊन वाहतुकीच्या नियमांच्या संदर्भात जनजागृती केली.

या वेळी ४५ ते ५० रिक्षा चालक व प्रवासी उपस्थित होते सर्वांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन सदर प्रबोधनाबाबत समाधान व्यक्त केले.

# तक्का स्मशानभूमी व विसर्जन घाट येथे पत्र्याचे शेड उभारा

## *भाजप नेते जयंत पगडे यांची मागणी*

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तक्का स्मशानभूमी व विसर्जन घाट येथे पत्र्याची शेड उभारण्याची मागणी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष व माजी नगरसेवक जयंत पगडे यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे केली आहे.

जयंत पगडे यांनी या संदर्भात निवेदन दिले असून त्यांनी निवेदनात म्हटले की, तक्का गाव प्रभाग क्रमांक २० मध्ये गाढी नदी पात्रालगत तक्का स्मशानभूमी आहे. त्यालाच लागून पनवेल महानगरपालिके मार्फत विसर्जन घाट बांधलेला आहे. हया विसर्जन घाटाची लांबी रुंदी १०० X ५० फूट आहे. विसर्जन घाटावर गणेशोत्सवातील गणेश मूर्ती, नवरात्र उत्सवातील देवींच्या मूर्ती विसर्जन होत असतात तसेच तक्का गाव कॉलनी परिसरातील व पनवेल शहरातील हजारो लोक हया ठिकाणी दशक्रिया विधी संपन्न करत असतात, मात्र हे विधी करत असताना हया विसर्जन घाटावर ऊन व पावसापासून सरंक्षण व्हावे म्हणून शेड उपलब्ध नसल्याने नागरीकांचे हाल होतात. व त्यांना मानसिक शारीरीक त्रास होत असतो. त्या ठिकाणी पत्र्यांची मोठी मजबूत शेड उभारल्यास सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळणार आहे. त्यामुळे या ठिकाणी पत्र्याचे शेड त्वरित बांधण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

## निवडक

### दोन मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** परिसरातून गेल्या २४ तासात दोन मोटार सायकलची चोरी झाल्याची घटना घडली आहे. शहरातील एसटी बस स्टँण्ड समोर असलेल्या कोकण हॉटेल येथे भारत राठोड हे त्यांची मोटरसायकल त्या ठिकाणी ठेवून जेवणासाठी गेले असताना अज्ञात चोरट्यांनी ६० हजार रुपये किंमतीची होंडा शाईन मोटरसायकल (एमएच-२१-बीएक्स-६८१८) ही चोरून नेली आहे. तर दुसर्या घटनेत उमेश गायकर यांनी त्यांची बुलेट मोटार सायकल पळस्पे फाटा येथे जेएनपीटी ते पळस्पे जाणाऱ्या उड्डाण पुलाखाली उभी ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर गाडी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### जितेंद्र गायकवाडांना पोलीस पदक

**पनवेल :** पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र अंकुशराव गायकवाड सध्या चेंबूर पोलीस स्टेशन येथे कार्यरत असून त्यांना



त्यांच्या पोलीस खात्यातील गुणवत्त सेवेबद्दल पोलीस पदक जाहीर करण्यात आले आहे. पोलीस सेवेमध्ये केलेली चांगली कामे, विविध दाखल गुन्ह्यांची उकल, वार्षिक शेरे, कामाची गुणवत्ता, अशा विविध निकषांवर आधारित त्यांना हे पदक देण्यात आले आहे. त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन त्यांना गुणवंत सेवेबद्दल पोलिस पदक देण्यात येणार आहे. पनवेलमध्ये देखील त्यांनी राज्य गुप्तवार्ता विभागात चांगले काम करून आपला ठसा उमटवला होता. अलिबाग किल्ल्यातील देवीचे दागिन्यांची चोरी झाली होती.आरोपीला मुरुड मधील तुरवाडी येथून ताब्यात घेऊन दागिने हस्तगत केले होते.

# महिलेच्या मनात लज्जा उत्पन्न करणारा व्यक्ती ताब्यात

**पनवेल :** महिलेच्या मोबाईलवर व्हॉट्सॲपवरून व्हिडीओ कॉल करून आरोपीने स्वतःच्या चेहरा न दाखविता स्वतःच्या शरिरावरचे सर्व कपडे काढून अश्लिल कृत्य करून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याने आरोपीला नागपूर येथून ताब्यात घेतले आहे.

करंजाडे येथे राहणाऱ्या एका महिलेला त्या घरी असताना आरोपी शुभम खरबे याने महिलेच्या मोबाईलवर व्हॉट्सॲपवरून व्हिडीओ कॉल करून आरोपीने स्वतःच्या चेहरा न दाखविता स्वतःच्या शरिरावरचे सर्व कपडे काढून अश्लिल कृत्य करून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केल्याने याबाबतची तक्रार महिलेने पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली.

त्यानुसार देताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ना.रवींद्र पारधी, पो.कॉ.पाटील यांनी सदर आरोपीचा तांत्रिक तपासाद्वारे शोध घेतला असता हा आरोपी नागपूर येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने त्या ठिकाणी जावून त्याच्या घरचा पत्याचा शोध घेवून त्याला वरील गुन्ह्याखाली ताब्यात घेऊन पुढील कारवाई केली आहे.

### महाराष्ट्र दिनानिमित्त आज ध्वजारोहण

**उरण :** महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६५ वा वर्धापन दिन समारंभानिमित्त गुरुवारी (दि.१) सकाळी ८ वाजता उरण विधानसभा मतदार संघ आमदार महेश बालदी यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम तहसील कार्यालय, उरण येथील प्रांगणात होणार आहे. ही माहिती उरण तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी दिली असून सर्व नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, अशी विनंती केली आहे.



**पनवेल : श्री कृष्ण शरण श्री साई विद्यासृष्टी शैक्षणिक व सामाजिक ट्रस्टच्या वतीने तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत मालडुंगेला रुग्णवाहिका भेट देण्यात आली असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले. या वेळी पंचायत समितीचे माजी सदस्य राज पाटील, सरपंच सीताराम चौधरी, उपसरपंच जनार्दन निरगुडा, माजी सरपंच जोमा निरगुडा, राजेश भोईर यांच्यासह श्री कृष्ण शरण श्री साई विद्यासृष्टी शैक्षणिक व सामाजिक ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते.**



**पनवेल : नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट अँड रिसर्च सेंटरमधून पोस्टग्रॅज्यूट इन क्वांटिटी सर्व्हिंग अँड कॉन्ट्रॅक्ट मॅनेजमेंटची पदवी यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल श्वेता शोभा भार्गव ठाकूर यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून श्वेता ठाकूरच्या शैक्षणिक यशाचे कौतुक केले आणि उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. या अभिनंदन सोहळ्यावेळी भार्गव ठाकूर, रामदास ठाकूर, ऋषिकेश ठाकूर यांच्यासह कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.**

# अक्षय तृतीयानिमित्त राधा कृष्ण मंदिरात पूजा

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून मंदिराला १० लाखांची देणगी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर जय भारत नाका येथील श्री राधा कृष्ण मंदिरात कलासंकोच विधी पूजा मोठ्या भक्तिभावाने झाली. या विशेष प्रसंगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्री राधा कृष्ण मंदिराला भेट दिली आणि दहा लाख रुपयांची देणगी देण्याची घोषणा केली.



या वेळी मंदिरातील धार्मिक विधींमध्ये रामशेठ ठाकूर यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि देवदर्शन करून आशीर्वाद घेतले. या वेळी माजी नगरसेविका रूचिता लोंढे समेळ, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर केदार भगत यांच्यासह मंदिराचे अध्यक्ष संजीव समेळ, सचिव राजीव समेळ, खजिनदार प्रविण समेळ, विश्वस्त चिन्मय समेळ, अनिल हजारे आणि परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मदत जाहीर केल्याबद्दल मंदिर प्रशासनाने त्यांचे आभार मानले आहेत. या दहा लाखांचा निधी मंदिराच्या विकासकामांसाठी आणि आवश्यक सुविधांसाठी वापरला जाणार आहे, ज्यामुळे भाविकांना अधिक चांगली सेवा मिळू शकेल.






**उलवे : न्हावाशेवा वाहतुक शाखे अंतर्गत उलवे बीट वाहतुक पोलीस चौकीमध्ये अक्षय तृतीयानिमित्त गणेश पुजेचे आयोजन बुधवारी करण्यात आले होते. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी वरीष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम.मुजावर, पोलीस हवालदार किरण म्हात्रे, पोलीस शिपाई मयुर पाटील उपस्थित होते.**

# लोकसेवा हक्क दिनी पथनाट्य व व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिनांक २८ एप्रिल हा दिवस लोकशाही हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीचा स्मरणदिन म्हणून साजरा करण्याबाबत शासनाने आदेशित करण्यात आले आहे, त्यानूसार महापालिकेच्या वतीने विविध जनजागृती उपक्रम राबवले जात आहेत. यामध्ये आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार नुकतेच महापालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी पथनाट्य, महापालिका व डी.डी विसपुते अध्यापक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानातून व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दिनांक २८ एप्रिल हा दिवस लोकशाही हक्क अधिनियम २०१५च्या अंमलबजावणीचा स्मरणदिन म्हणून साजरा करण्याबाबत शासनाने आदेशित करण्यात आले आहे, त्यानूसार महापालिकेच्यावतीने विविध जनजागृती उपक्रम राबवले जात आहेत. महापालिकेच्यावतीने ‘पनवेल कनेक्ट ॲप’ लाँच करण्यात आले असून या ॲपच्या माध्यमातून नागरिकांना सुमारे ६२ सेवा दिल्या जात आहेत. महापालिकेच्या विविध सेवांच्या माध्यमातून कारभार अधिकाधिक लोकाभिमुख, उत्तरदायि, पारदर्शक करण्याच्यादृष्टीने भर देण्यात येत आहे. या विषयी जनजागृती करण्याच्यादृष्टीने महापालिका कार्यक्षेत्रात पनवेल बस स्टॅन्ड, वडाळे तलाव, पनवेल भाजी मार्केट, खारघर हिरानंदानी, सेंट्रलपार्क अशा विविध ठिकाणी पथनाट्य सादर करण्यात आली.

महापालिका व डी. डी विसपुते अध्यापक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानातून प्राचार्य सीमा कांबळे यांनी लोकसेवा हक्काविषयी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष धनराज विसपुते यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच महापालिकेच्या उर्दु शाळेमध्ये लोकसेवा हक्क दिनानिमित्ताने पोस्टर स्पर्धा घेण्यात आल्या.









## संपादकीय


# ऐतिहासिक निर्णय

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने जातिनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान मोदी यांच्या निवासस्थानी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी हा निर्णय घेण्यात आला. देशाला स्वातंत्र्य प्राप्त होऊन इतकी वर्षे लोटल्यानंतरही मागास राहिलेल्या जातींना या निर्णयामुळे अखेर न्याय मिळू शकेल.

**गेली काही वर्षे प्रत्येक निवडणुकीचे वेळी जातिनिहाय जनगणनेचा मुद्दा डोके वर काढत होता. आता मोदी सरकारच्या जातिनिहाय जनगणनेच्या ऐतिहासिक निर्णयानंतर लवकरच त्या दिशेने हालचाली सुरू होतील. मोदी सरकारचा हा निर्णय देशाच्या भविष्याशी निगडित असून नक्कीच समाजातील सर्व जातीपातींना न्याय देण्याचे काम या निर्णयातून होऊ शकेल. येत्या काही महिन्यांत बिहारमध्ये विधानसभा निवडणुका असून त्या आधी केंद्र सरकारने घेतलेला हा निर्णय म्हणजे एक मास्टरस्ट्रोक आहे असेही म्हटले जाते आहे. कारण केंद्र सरकारला कोंडीत पकडण्यासाठी विरोधी पक्षांकडून विशेषत: काँग्रेस पक्षाकडून जातिनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली जात होती. आता सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने त्यांच्याकडून हा मुद्दा देखील काढून घेतल्याने काँग्रेस पक्षाची पंचाईत होईल असे म्हटले जाते आहे. काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी आमची मागणी केंद्र सरकारने स्वीकारली याचा आनंद आहे असे म्हणत या निर्णयाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला खरा, परंतु या निर्णयासंबंधीच्या पत्रकार परिषदेत बोलतानाच केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काँग्रेस पक्षावर यासंदर्भात नेमकी टीका केली. काँग्रेस पक्षाने नेहमीच जातिनिहाय जनगणनेला विरोध केला होता. त्यांनी निव्वळ राजकीय मुद्दा म्हणून ही मागणी लावून धरली अशी टीका वैष्णव यांनी केली. खरेच, स्वातंत्र्यानंतर इतकी वर्षे सत्ता ताब्यात असताना काँग्रेसने कधीही जातिनिहाय जनगणना का केली नाही? जातिनिहाय जनगणना करण्याच्या मोदी सरकारच्या निर्णयाचे श्रेय घेण्याआधी काँग्रेस पक्षाला याचे उत्तर द्यावे लागेल. भारतात १८११ मध्ये धर्म आणि जातींच्या आधारावर प्रथमच जनगणना झाली होती. त्यानंतर प्रत्येक दशकात ती घेण्यात आली. स्वातंत्र्यानंतरची पहिली जनगणना १९५१ मध्ये करण्यात आली, मात्र स्वातंत्र्यानंतर केवळ धर्माच्या आधारावर तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या आधारावर जनगणना करण्यात आली. त्यानंतर अलीकडे बिहार सरकारने केलेल्या जनगणनेत सर्व जातींच्या जनसंख्येचे गणन करण्यात आले. जातींच्या आधारावर जनगणना घोषित करणारे बिहार हे पहिले राज्य ठरले. अन्य काही राज्यांमध्ये जातींच्या आधारावर जनगणना झाली होती. उदाहरणार्थ कर्नाटक राज्यानेही जातिनिहाय जनगणना केली, परंतु संबंधित आकडेवारी मात्र घोषित केली नाही. बिहारमधील जातिनिहाय जनगणनेतून त्या राज्यातील विविध धर्म आणि जाती यांची जनसंख्या किती आहे हे स्पष्ट झाले. तथापि, कोणतीही आश्चर्यकारक बाब या जनगणनेतून समोर आली नाही. अपेक्षेप्रमाणेच ही संख्या होती. आता मोदी सरकारच्या निर्णयामुळे संपूर्ण देशभरात आगामी जनगणनेमध्ये जातनिहाय जनगणनाही समाविष्ट होईल. जातनिहाय जनगणनेमुळे एखाद्या प्रदेशात ज्या जातीच्या संख्याबळात वाढ झाली, तेथे त्यांचा आरक्षण टक्का वाढवता येईल का याचा विचार होऊ शकेल. संख्याबळ कमी झालेले दिसेल, तेथे आरक्षण टक्का कमी होईल व मागासवर्गीयांना न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त होते आहे. जातनिहाय जनगणनेतून सामाजिक आणि आर्थिक विषमतेचे तपशील समोर येतील. निवडणुकीत दिलेले आणखी एक आश्वासन मोदी सरकारने या निर्णयाने पूर्ण केले आहे.**

# बिबट्यांचा धुमाकूळ; पोलादपूर तालुक्यात भितीचे वातावरण







वन्यजीव संरक्षण अधिनियमाद्वारे वन्यजीवांचे संरक्षण करण्याचे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे बजावण्यात येत असले तरी वनअधिवासाचे क्षेत्र सोडून मानवीवस्तीमध्ये आलेल्या हिंस्त्र प्राण्यांकडून मानवीजीवन धोक्यात आणले गेल्यास त्याबाबत वनविभागाने कधी कारवाई करायची याबाबत कोणतेही कालनिकष नसल्याने पोलादपूर तालुक्यातील वन्यपशूंमुळे विशेषत: बिबटयांच्या मुक्तसंचारासह पाळीव प्राण्यांच्या फडशा पाडण्यामुळे ग्रामीण भागात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटात सोमवारी सायंकाळी बिबटयाचे दर्शन झाल्यावर एका मोटारसायकलस्वाराने प्रसंगावधान राखून बिबटयाचे मोबाईलवरून शुटींग केल्यानंतर सोशल मिडियावर हे शुटींग व्हायरल झाले. यासंदर्भात वनविभागाने बिबटयाच्या वावरण्याबाबत दुजोरा दिला आहे.

पोलादपूर वाई सुरुर महामार्गावर सध्या रुंदीकरण सुरू असताना वाहतूक देखील सुरू आहे. आज सोमवारी दुपारी वाहनचालकांना उन्हाच्या झळा बसल्याने सायंकाळी अनेक मोटारसायकलस्वारांनी आप आपल्या इप्सित स्थळी जाणे पसंत केले. मात्र, दाभिळटोक ते आंबेमाचीदरम्यानच्या एका वळणावर संरक्षक कठडयांपलिकडे मोटारसायकलच्या हेडलाईटमुळे लाल रंगाचे दोन डोळे दिसल्याने प्रसंगावधान दाखवून मोटारसायकलस्वारांनी तातडीने मोटारसायकल थांबवित मोबाईलने व्हिडिओ शूटिंग करीत अंदाज घेतला. यावेळी संरक्षक कठडयांलगत एक बिबटया उजेडाचा अंदाज घेत दरीच्या बाजुच्या कठडयाखालून आंबेनळी घाटरस्ता ओलांडून डोंगराकडे वेगाने निघून गेला.मोटारसायकलस्वाराने प्रसंगावधान दाखवून मोटारसायकल थांबवली नसती तर तो बिबटयाच्या टापूत आला असता आणि बिबटयाने त्याच्यावर झडप घातली असती.

सुदैवाने गेल्या सोमवारी सायंकाळी कोणत्याही प्रकारची अनुचित घटना झाली नसली तरी भविष्यात संध्याकाळनंतर मोटारसायकलस्वारांनी सावधतेने वाहन



चालविण्याची दक्षता घ्यावी, असे ग्रामस्थांनी सांगितले.

पोलादपूर वनविभागाने आंबेनळी घाटात बिबटयाचा वावर असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला असून पोलादपूर तालुक्यातील वन्यजीवांची मोजणी करण्यासाठी वनविभागाने वन्यजीवांच्या पिण्याच्या पाण्याच्या जागा शोधून गणती करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील काळवली गावच्या जंगल भागात बिबटया असल्याचे रविवारी रात्री मुख्य रस्त्यावरून जाताना स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले आहे. घटनास्थळाची पाहणी वन विभागाकडून करण्यात आली आहे.

दरवर्षी ऐन उन्हाळयातच काळवली पवारवाडी, विठ्ठलवाडीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरून रात्रीच्या वेळी जाताना येताना बिबटया निदर्शनास येत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. डोंगर भागात असलेल्या काळवली विठ्ठलवाडी, पवारवाडी व भोसलेवाडी परीसरात घनदाट जंगल असल्याने येथील नागरिकांना बिबटयाचा वावर सुरू झाल्याने भिती निर्माण झाली आहे. विठ्ठलवाडी येथील जंगलात असलेल्या म्हसोबा तलाव २०२१ साली झालेल्या अतिवृष्टीमुळे पुर्णत:

**खबरबात**
**शैलेश पालकर**

मातीने बुजून गेला असल्याने जंगलातील वन्यप्राण्यांनी पाण्यासाठी तळभागाकडे आपला मोर्चा वळवला असावा असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

वन विभागाकडून घनदाट जंगलात वन्यप्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली तर वन्यप्राण्यांचे पाण्यासाठी जंगलातून लोकवस्तीकडे येण्याचे प्रमाण कमी होवू शकते, काळवली गावातील नागरिकांच्या गंभीर समस्येचे वन विभागाकडून तात्काळ निवारण करण्यात यावे अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

या घटनेची माहिती समजतात वन क्षेत्रपाल राकेश साहू व परीमंडळ अधिकारी बाजीराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नियत क्षेत्र अधिकारी संदिप परदेशी व परीमंडळ कर्मचारी यांनी काळवली पाटीलवाडी व हावरे गावात जाऊन बिबटया पळवून लावण्यासाठी फटाक्यांचे वाटप केले तसेच गावातील लहान बालके महिला सह ग्रामस्थांना मार्गदर्शन करीत जनजागृती केली आहे. पोलादपूर सारख्या दुर्गम डोंगराळ भागात डोंगर दऱ्या खोऱ्यात बिबटयाचा वावर असू शकतो हे वन विभागाने मान्य केले असून नागरिकांनी स्वत:ची संरक्षण आणि दक्षता घेण्यासाठी रात्रीच्या वेळी एकटे बाहेर पडू नये तसेच काठी व बॅटरीचा आधार घ्यावा असे आवाहनही केले आहे.

पोलादपूर वनविभागाने आतापर्यंत बिबटयाच्या हल्ल्यात गुरे ठार झाल्याने शेतकऱ्यांना दिलेल्या आर्थिक मदतीचे क्षेत्र पाहता पोलादपूर तालुक्यात सहा ते आठ बिबटयांचा वावर असावा अशी शक्यता निर्माण झाली आहे. यामध्ये पळचिल गोलदरा, कोतवाल, चांभारगणी, तुर्भे, कालवली, कापडे खुर्द, गोवेले परिसर, बोरज या भागात गुरांचा अचानक जखमी अवस्थेत मृत्यू होण्याच्या घटनांनी बिबटयांच्या संख्येला दुजोरा मिळत आहे किंवा बिबटयांचे वावरण्याचे क्षेत्र अधिक असल्याने वेगवेगळया गावांमध्ये अशा घटना घडल्याचे दिसून आले आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी गाईगुरांचा जीव जातोय म्हणून सानुग्रह अनुदान देण्यापलिकडे विचार करण्याची आवश्यकता आहे.

पोलादपुर हा रायगड जिल्ह्यातील डोंगराळ तालुका आहे आहे. एका बाजुला सातारा जिल्हा तर दुसर्या बाजुला रत्नागिरी जिल्हा.या दोन्ही जिल्ह्यातील घनदाट जंगलाचा भाग लागुन असल्याने तेथिल जंगली श्वापदांचा वावर येथिल रस्त्यांवर असतो. त्यामुळे गाईगुरांचा जीव घेण्याने रक्ताची चव लागलेल्या या जंगली श्वापदांकडून माणसांचेही रक्त पिण्यासाठी हल्ले होण्याची शक्यता नाकारता येणार नाही त्यामुळे वन विभागाने पोलदपुर तालुक्यात पावसाळयापूर्वी वनातील खैर व अन्य वृक्षतोड थांबवून जंगली श्वापदांचा वनअधिवास दाट करण्याची तसेच वनक्षेत्रामध्ये पाणवठे बांधण्याची गरज असल्याचे जाणवत आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअ‍ॅपमध्ये सीक्रेट चॅटसाठी आले नवे फीचर

इन्स्टंट मेसेजिंग अ‍ॅप व्हॉट्सअ‍ॅपने Advanced Chat Privacy नावाचं एक नवीन प्रायव्हसी फोक्स्ड फीचर आणलं आहे. हे फीचर अशा प्रकारे डिझाइन केलं आहे की ते युजर्सच्या सर्वात संवेदनशील संभाषणांचं संरक्षण करेल. आता हे फीचर ग्लोबली रोलआऊट करण्यात आलं आहे.



या नवीन फीचरअंतर्गत, नवीन सेटिंग्ज उपलब्ध असतील, ज्या पर्सनल चॅट आणि ग्रुप चॅट दोन्हीसाठी उपलब्ध असतील. अशा परिस्थितीत, जेव्हा जेव्हा युजर्सना असं वाटतं की त्यांचं कोणतंही चॅट अधिक संवेदनशील आहे, तेव्हा ते एडव्हान्स्ड चॅट प्रायव्हसीच्या मदतीने त्यांचा कंटेंट व्हॉटस्अ‍ॅपच्या बाहेर शेअर होण्यापासून रोखू शकतील.

व्हॉटस्अ‍ॅपच्या या लेटेस्ट अपडेटनंतर, सेटिंग्जमध्ये दिलेला पर्याय चालू केल्यानंतर, तुम्ही इतर लोकांना चॅट्स एक्सपोर्ट करण्यापासून, फोनवरील मीडिया ऑटो-डाउनलोड करण्यापासून रोखू शकता. तुम्ही इतर युजर्सना सहजपणे खात्री देऊ शकाल की चॅटमधील किंवा तुमच्या संभाषणातील कंटेंट कुठेही लीक होणार नाही.

**अशी ऑन करा सेटिंग**

नवीन फीचर इनेबल करण्यासाठी तुम्हाला सेटिंग्जमध्ये जाऊन ते ऑन करावं लागेल. यासाठी चॅटच्या नावावर आणि नंतर 'अ‍ॅडव्हान्स्ड चॅट प्रायव्हसी'वर टॅप करा. हे या फीचरचं पहिलं व्हर्जन आहे. येत्या काळात कंपनी या फीचरसोबत सुरक्षेशी संबंधित इतर अनेक फीचर देखील समाविष्ट केली जाऊ शकतात. ग्लोबल रोलआऊट केल्यानंतर हे फीचर काही युजर्सपर्यंत पोहचलं आहे आणि उर्वरित युजर्सना लवकरच मिळेल.

**इतर प्रायव्हसी फीचर**

व्हॉटस्अ‍ॅपमध्ये प्रायव्हसी लक्षात घेऊन अनेक फीचर आहेत. तुम्हाला हवं असल्यास तुम्ही तुमचं कोणतंही पर्सनल चॅट लॉक करू शकता. कोणतंही चॅट लॉक करण्यासाठी त्याच्या नावावर क्लिक करा. त्यानंतर तुम्हाला नवीन पर्याय मिळतील, जर तुम्ही खाली स्क्रोल केलं तर तुम्हाला चॅट लॉकचा पर्यायदेखील मिळेल.

# महाराष्ट्र दिन स्थापना

१ मे हा महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन. याच दिवशी १९६० साली स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. यशवंतराव चव्हाण यांच्याकडे महाराष्ट्राच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविली गेली.

महाराष्ट्राचा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा फार मोठा आहे. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत आणि त्यानंतरही देशाच्या प्रत्येक विधायक उपक्रमात महाराष्ट्राने हिरीरीने सहभाग घेतला आहे. प्राचीन संस्कृतीचा वारसा सांभाळतानाच देशाच्या विकासातही योगदान दिले आहे. महाराष्ट्राचा धार्मिक सुधारणांचा, सामाजिक सुधारणांचा इतिहास प्रेरणादायी आहे. राज्याचे विविधांगी भावविश्व थक्क करणारे आहे.

महाराष्ट्र ही संत-महंत, ऋषी-मुनींची जशी भूमी आहे तशीच शूरवीरांचीही आहे. या भूमीला पराक्रमाची, त्यागाची, देशप्रेमाची परंपरा लाभली आहे. छत्रपती शिवरायांनी सर्वधर्मसमभावाचे पालन केले. हिंदवी स्वराज्य, रयतेचे राज्य स्थापन केले. छत्रपती शिवरायांपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, उमाजी नाईक, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, राजगुरु, नाना पाटील यासारख्या अनेक देशभक्तांनी




**निमित्त**

इंग्रजांविरूद्ध लढा उभारला. अतोनात कष्ट, यातना सहन केल्या. त्यासाठी प्राणांचीही पर्वा केली नाही.

संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वार, संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत तुकाराम, समर्थ रामदास, संत गोरा कुंभार, संत सावतामाळी, संत नरहरी सोनार, सेना महाराज, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत कान्होपात्रा, संत एकनाथ, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशा संतांच्या मांदियाळीने महाराष्ट्र मनाचे संवर्धन, पोषण करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक विचार रुजविण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी अण्णासाहेब कर्वे, कर्मवीर शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या समाजसुधारकांनी समाज प्रबोधनासाठी अपार कष्ट घेतले.

देशाच्या स्वातंत्र्याचे स्वप्न पहात असतांनाच द्विभाषिक राज्याचे एक शक्तीशाली राज्य व्हावे यासाठी लोकनेते, बुद्धीवादी, लेखक, पत्रकार यांनी मराठी भाषिक प्रदेशएकत्र आणण्याची कल्पना मांडली. एस.एम. जोशी, आचार्य प्र.के. अत्रे, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे यांच्यासह अनेक जण नवमहाराष्ट्रासाठी एक झाले आणि संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार केले.

महाराष्ट्राने आतापर्यंत साहित्य, कला, शिक्षण, क्रीडा, संस्कृती, नाट्य, चित्रपट, संगीत, सहकार, कृषी, उद्योग, संगणक, विज्ञान अशा विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. आपल्या पूर्वजांनी दिलेल्या योगदानाची जाणीव ठेवत वैभवशाली इतिहास जपत प्रगतीची नवनवी शिखरे पादाक्रांत करण्याचा निर्धारआपण करावयास हवा.

१ मे हा दिवस राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाचा आहे. याच दिवशी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली होती. दुसरे म्हणजे याच दिवशी आंतरराष्ट्रीय कामगार दिन असतो. म्हणून त्यास जगभर मान्यता मिळाली आहे. (साभार : विकासपीडिया)

**बातमीतील बात**




## आरोग्य प्रहर

# सारखं फ्रिजमधलं पाणी पिता? मग आताच थांबा!

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये गार पदार्थांमुळे मनाला शांती आणि पोटाला आराम मिळतो. मस्त थंडगार काही प्यायल्यावर मन अगदी प्रसन्न होऊन जाते. घशाला बरे वाटते तसेच पोटालाही बरे वाटते. उन्हाळा सुरू झाला की फ्रीज तांबे-बाटल्यांनी भरुन जातो. अख्खीच्या अख्खी बाटली आपण पिऊन टाकतो. साध्या पाण्याने मन भरत नाही. गार पाणी प्यायल्यावरच समाधान मिळते. मात्र अति प्रमाणात असे गार पाणी पिणे चांगले आहे का? तर नाही. कोणतीच गोष्ट अति खाणे किंवा पिणे आरोग्यासाठी चांगले नाही. अगदी पाणीसुद्धा.



पोटाला गरजेचा असलेला थंडावा साध्या पाण्यातूनही मिळतोच. फळांच्या रसातून मिळतो. थंडावा देणार्या अन्नातून मिळतो. गार पाणी प्यायल्याने नक्कीच समाधान मिळते. मात्र उन्हाळा संपेपर्यंत फक्त गारच पाणी पिणे आरोग्यासाठी चांगले नाही.

गार पाणी पिणे शरीरासाठी चांगले नाही असे गुंजन शाऊट्स या चॅनलवरून एक्सपर्ट्सनी सांगितले. तसेच इतरही अनेक डॉक्टरांची आणि तज्ज्ञांचे गुगलवर आर्टिकल्स उपलब्ध आहेत, ज्यामध्ये गार पाणी सतत पिऊ नका असे स्पष्ट सांगितले आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांमध्येही तुम्हाला खोकला होतो का? मग तो खोकला गार पाणी प्यायल्यामुळेच झाला आहे. गार पदार्थांमुळे सर्दी खोकला होतो हे तर आपण जाणून आहोत. गार पाण्यामुळे घसा खराब होतो. आवाजही बदलतो. सर्दी खोकला जास्त दिवस राहिला तर त्यामुळे ताप येणे तसेच इतरही काही इंनफेक्शन्स होण्याची शक्यता असते.

गार पाण्याचा पचन संस्थेवर परिणाम होतो. अपचनाचे प्रमाण वाढते. पचनासाठी पाण्याची फार आवश्यकता असते. गरम पाणी प्यायचा सल्ला डॉक्टर देतात अगदी त्या उलट गार पाण्याचे आहे. गार पाण्याचा पचनसंस्थेला जास्त काही फायदा होत नाही. त्यामुळे गॅसेस होतात. ब्लोटींग होते. पचन चांगले न झाल्याने इतरही काही समस्या उद्भवतात. त्यामुळे पाणी साधेच प्यावे. थोडे गार पाणी पिणे नक्कीच त्रासदायक नाही. थंड पाणी प्यायल्याने उन्हामुळे आलेला थकवा जाऊन जरा तरतरी येते. त्यामुळे आपल्याला गार पदार्थ प्यावेसे वाटते. मात्र त्याचे प्रमाण जास्त होऊ देऊ नका. माठातील पाणी प्या. ते नैसर्गिक रित्या गार झालेले असते.

# वर्षभरात ५९८ कमी वजनाच्या बालकांवर यशस्वी उपचार

**अलिबाग : प्रतिनिधी**

कमी वजनाच्या बालकांवर जन्मानंतर यशस्वी उपचार करून त्यांना सुदृढ बनवण्याचे रायगडच्या जिल्हा सामान्य रुग्णालयाकडून सुरू आहे. जिल्हा रुग्णालयात गेल्या १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ वर्षभरात ५९८ मुलांना गुटगुटीत करण्यात डॉक्टरांना यश आले आहेत.

अलिबाग जिल्हा रुग्णालयात स्वतंत्र प्रसूती कक्ष तयार केलेले आहे. त्यामुळे जिल्ह्यातून गरोदर माता ह्या प्रसूती साठी जिल्हा रुग्णालयात दाखल होत असतात. तसेच जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात जन्माला आलेली बाळे प्रकृती स्वास्थ्यासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवली जातात. जिल्हा रुग्णालयात नवजात बालक कक्ष ही उपलब्ध आहे. त्यामुळे जन्माला आल्यानंतर बालकाची प्रकृती नाजूक असल्यास नवजात बालक कक्षात उपचारासाठी ठेवले जाते. या ठिकाणी डॉक्टर यांच्याकडून बालकांवर योग्य उपचार करून ते सदृढ करण्याचा प्रयत्न केला जातो.

जिल्हा सामान्य रुग्णालयात १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या आर्थिक




वर्षात एकूण ३ हजार २०५ मुले जन्माला आली. यामध्ये १ हजार ६८१ मुले तर १ हजार ५२४ मुली जन्माला आल्या. यापैकी ५९८ मुले ही कमी वजनाची जन्माला आली होती. कमी वजनाची एकूण ५९८ बालकांवर वर्षभरात डॉक्टरांनी नवजात बालक कक्षात उपचार केले होते. यामध्ये दीड किलो पेक्षा कमी, एक किलो पेक्षा कमी वजनाची बालके उपचार घेत होती. वजन कमी असलेल्या बालकांचे वजन वाढणे आवश्यक असते. अन्यथा त्यांच्या जीवाला धोका निर्माण होत असतो. त्यामुळे अशा बालकाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असते.

जिल्हा रुग्णालयाचे प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ शीतल जोशी, मेट्रेन गायत्री म्हात्रे, सहाय्यक मेट्रेन अनिता भोपी यांच्या मार्गदर्शनाखाली नवजात बालक कक्षात असलेल्या डॉ सागर खेदु , परिचारिका सुजाता पाटील, शीतल राऊत या कक्षातील आरोग्य कर्मचारी यांच्या विशेष प्रयत्नामुळे ५९८ मुलांचे वजन वाढून त्यांना गुटगुटीत करण्यात यश आले आहे.

**जिल्हा रुग्णालयात नवजात बालक कक्ष तयार करण्यात आलेले आहे. या कक्षाला नुकतेच अकरा वर्षही पूर्ण झाले आहे. नवजात बालकाच्या आरोग्याची काळजी हे कक्षातील डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी योग्य पद्धतीने घेत असल्याने बालक हे कमी वजन असूनही गुटगुटीत केले जात आहेत.**

**– डॉ. शीतल जोशी,**
**अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक**

# स्व. संतोष पवार स्मृती पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा २०२५ उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड प्रेसचे आधारस्तंभ स्व. संतोष पवार यांच्या आकस्मित निधनानंतर कर्जत प्रेस क्लबने त्यांच्या स्मरणार्थ स्वर्गीय संतोष पवार स्मृती पत्रकारिता पुरस्कार सूरू केला. यंदा पाचव्या वर्षी माथेरान येथे या पुरस्काराचा वितरण सोहळा अगदी भावनात्मक वातावरणात संपन्न झाला. यंदा या सोहळ्यात माथेरान प्रेस क्लब सुद्धा सहभागी झाले होते.



माथेरान मधील प्रीती हॉटेलच्या प्रांगणात पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त कार्यक्रमाचे अध्यक्ष एस एम देशमुख यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून समारंभचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी प्रहारचे संपादक डॉ. सुकृत खांडेकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, जेष्ठ कविवर्य अरुण म्हात्रे, मनोज खांबे, रायगड प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे, माजी नगराध्यक्ष अजय सावंत, विवेक चौधरी, विजय कदम, चंद्रकांत चौधरी, प्रवीण सकपाळ, अनिल सोनाने, कुलदीप जाधव, राजेश चौधरी, अनिल गायकवाड, अनिल गवळे, भाई ओव्हाळ, मनीषा पवार, शकील शेख आदी उपस्थित होते.

राज्यस्तरीय संपादक पुरस्कार दैनिक प्रहारचे संपादक सुकृत खांडेकर यांना शाल, तुळशीचे रोप, सन्मानपत्र आणि अकरा हजार रुपये रोख स्व.सुनील दांडेकर स्मृती रायगड जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कार दैनिक सागरचे स्थानिक संपादक मनोज खांबे यांना शाल, तुळशीचे रोप, सन्मानपत्र आणि पाच हजार रुपये रोख स्व. धर्मानंद गायकवाड तालुकास्तरीय पुरस्कार कर्जत येथील येथील दै.कृषीवलचे पत्रकार अनिल गवळे यांना प्रदान करण्यात आला. शाल, तुळशीचे रोप, सन्मानपत्र आणि तीन हजार रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप होते.

डॉ. सुकृत खांडेकर यांनी,सोशल मीडियामुळे हल्ली वाचन कमी झाले आहे. सोशल मीडियावर धरबंध नसल्याने समाजिक वातावरण बिघडत आहे. त्यांच्याकडे पि आर ओ आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधिंना पत्रकारांची गरज नाही. आपल्याला आयत्या बातम्या मिळतात. पत्रकारिता कुठे चालली आहे. संपूर्ण मोहळ बदलला आहे. याचे पत्रकारांनी भान ठेवले पाहिजे. पत्रकारांनीच आपली किंमत करून घेतली आहे. सोशल मीडियावर जे वॉर सुरु आहे तो अत्यंत किळसवाणा व अश्लीश भाषेत सुरु आहे. सोशल मीडिया पत्रकारितेसाठी आव्हान आहे. संपादक कंत्राटी नोकर आहोत. आम्ही संपादक मालकांच्या भूमिका प्रभावीपणे व चांगल्या शब्दात मांडण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करतात.

अध्यक्षीय मनोगतात एस. एम. देशमुख यांनी, ' संतोष पवार यांनी माथेरानच्या सामाजिक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. अनेक प्रश्न त्यांनी सोडवले. रायगडच्या पत्रकारितेमध्ये सुद्धा पवार यांचे मोठे योगदान आहे. माथेरानच्या प्रश्नांचा सिलसिला अजून थांबत नाहीत. सर्वांनी एकत्रित राहून हे प्रश्न हे प्रश्न सोडवावेत. पवार यांच्या संकल्पनेमुळे माथेरान महोत्सव सुरु झाला. मुंबई, ठाणे, पुणे आदी ठिकाणी हे महोत्सव सुरु केले होते. त्यामुळे माथेरानचे पर्यटन निश्चितच वाढले. ते पुन्हा सुरु करावा. माथेरानचे वैभव टिकवून ठेवावा.' असे सांगितले.



**अलिबाग : जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते आदर्श आपले सेवा केंद्र थळ ग्रामपंचायतचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, उपजिल्हाधिकारी डॉ रविंद्र शेळके, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, मानसी ताई दळवी आदी उपस्थित होते. दरम्यान, नागरिकांना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले.**

# गुरांना पाण्याची टाकी ठेवून मानवतेचे दर्शन



**तळा : प्रतिनीधी**

ऐन उन्हाळ्यात डोक्यावर सुर्य आग ओकत असतो. त्यावेळी पशु पक्षी यांना पाण्याची तहान भागवण्यासाठी पाणी मिळत नाही. ही समस्या ओळखून तळा इंदापूर रस्त्यालगत स्वामी समर्थ नगर येथे व्यापारी केशव पटेल व सामाजिक कार्यकर्ते मोहन मांढरे यांनी सिनटॅक्सची लांब टाकी घेऊन त्यात पाणी ठेवले. बऱ्यापैकी गुरांची तहान भागत आहे.

त्यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, आपण तहान लागली तर पाणी पिऊ शकतो परंतू त्यांना तहान लागल्यानंतर ते रिकाम्या भांड्यांजवळ उभे राहून पाण्यासाठी धडपड करताना दिसले, म्हणून आम्ही ही टाकी ठेवली आहे. त्यांना पाणी पिताना बघताना आम्हांला आनंद होत आहे.

या कृतीतून माणुसकीचे दर्शन घडत आहे. कधीतरी विकतचे पाणी घेऊन टाकी भरून ठेवतात.

# शासकीय निवासी शाळेत प्रवेश

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शासकीय निवासी शाळेची प्रवेश प्रक्रिया १ एप्रिलपासून सुरू करण्यात आली आहे. शाळेत प्रवेश घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर सहाय्यक आयुक्त कार्यालय, समाज कल्याण, रायगड–अलिबाग (०२१४१–२२२२८७) किंवा अधिनस्त अनुसुचित जाती नवबौध्द मुलांकरिता शासकीय निवासी शाळा, जावळी, ता.माणगाव (९५११२२८६५४/९८५०१७०७६२) येथे संपर्क साधून, येथील कार्यालयात उपलब्ध प्रवेश अर्ज विहित नमुन्यात भरून खालील कागदपत्रांसह सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण सुनिल जाधव यांनी केले आहे. शाळेत सहावी ते दहावीच्या गरीब, हुशार, होतकरु, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, **मौजे जांभिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथे** खालील वर्णनाची मिळकत आहे. सदरहू मिळकती आमचे अशील, मिळकतीचे मालकांकडुन त्या खरेदीने घेण्याच्या विचारात आहेत व तशी प्राथमिक बोलणी आमचे अशीलांनी मिळकतीचे मालकांसोबत केलेली आहे.

सदरहू मिळकती निर्वेध व बोजारहित स्वतःच्या मालकी, वहिवाटीची व कायदेशीर हिश्याची असल्याबद्दलची खात्री त्या–त्या मिळकतीचे मालकांनी आमच्या अशीलांस दिलेली आहे. तरीही कोणीही व्यक्तिचा सदर मिळकतीत किंवा मिळकतीच्या एखाद्या भागात विरुध्द कब्जाने किंवा त्या भागात वारसा, गहाण, दान, विकी, देणगी, लीज, चार्ज, ट्रस्ट, लायसेन्स, पोटगी, इजमेंट किंवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क असल्यास त्यांनी खालील सही करणार याचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन दहा दिवसाच्या आत आपले कागदपत्रासह खालील पत्यावर समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात.

वरील मुदतीत हरकती दाखल न झाल्यास, एखादा हक्क असल्यास तो रद्दबातल झाला आहे किंवा असल्यास जाणीवपुर्वक सोडुन दिला आहे असे समजुन आमचे अशील वरील मिळकतीसंबंधी नियोजित व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीस आमचे अशील जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे जांभिवली ता. पनवेल**

| मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार | मिळकतीचे मालक |
|---|---|---|---|---|
| जांभिवली ता. पनवेल | ४५ | ९–९८–००<br>१–५३–००<br>११–५१–०० | २१–८५ | श्री. उदय डोंगरे<br>श्री. संतोष करमरकर<br>श्री. गुरुनाथ दत्तात्रेय पाटील<br>श्री. अशोक राजाराम गायकर<br>श्री. ज्ञानेश्वर रामा कोंडीलकर<br>श्रीमती जयश्री निलेश कोंडीलकर<br>श्री. अनिश निलेश कोंडीलकर |

सदरहु मिळकतीचे एकुण क्षेत्रापैकी श्री. अशोक राजाराम गायकर यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र वगळून उर्वरित मिळकतीचे मालकांचे अविभक्त हिस्सा, मालकी, ताबाकब्जा वहिवाटीचे **खाते क्र. २०४** कडे दर्शविलेले लागवडीखालील क्षेत्र ४–४९–१५ हे. आर. अधिक पो.ख. ०–६८–८५ हे.आर. एकुण क्षेत्र ५–१८–०० हे. आर. आकार रु. ९–८३ पै. अशी मिळकत

| मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार | मिळकतीचे मालक |
|---|---|---|---|---|
| जांभिवली ता. पनवेल | ४५ | ९–९८–००<br>१–५३–००<br>११–५१–०० | २१–८५ | श्री. राजेंद्र गजानन पाटील<br>श्री. दत्तात्रेय वाळकु पाटील |

सदरहू मिळकतीचे एकुण क्षेत्रापैकी वरील मिळकतीचे मालकांचे मालकी, ताबाकब्जा वहिवाटीचे **खाते क. २०५** कडे दर्शविलेले लागवडीखालील क्षेत्र १–४४–८२ हे. आर. अधिक पो.ख. ०–२२–१८ हे.आर. एकुण क्षेत्र १–६७–०० हे. आर. आकार रु. ३–१७ पै. अशी मिळकत

ठिकाण : उरण
दिनांक : ३०–०४–२०२५

**सही/–**
**ॲड. रमाकांत पाटील**
खरेदीदाराचे वकिल

ऑफीस : ऑफीस नं. ९, साईआकाश अपार्टमेंट, करंजा रोड, राजपाल नाका, डाके/साठे हॉस्पीटलजवळ उरण, ता. उरण, जि. रायगड

## उरण नगरपरिषद
**निविदा सुचना**

उरण नगर परिषद खाली नमुद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदाराकडून मोहरबंद निविदा दरपत्रके मागवित आहे. निविदा /दरपत्रक दिनांक १४/०५/२०२५ रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी उरण नगरपरिषद उरण यांचे नावे दाखल करणेच्या आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १ | भविष्यात येणाऱ्या नगरपरिषद निवडणूकांकरिता दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर ये–जा करणे करिता व्हिलचेअर मार्गावणे बाबत. | २०००/– | २०००/– |
| २ | उरण नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन केंद्रावर ओल्या कच–यावर ड्रम कंपोस्टींगव्दारे प्रक्रिया करणे कामी २०२५–२६ या आर्थिक वर्षाकरिता वार्षिक ठेकेदार नियुक्त करणे बाबत. | ३०००/– | २०००/– |
| ३ | स्वच्छ सर्वेक्षण २०२५ तसेच माझी वसुंधरा ५.० अंतर्गत धर्तीवर दुचाकी वाहनांना चार्जीग करणेकामी ई– चार्जींग स्टेशनची उभारणी करणे बाबत. | २०००/– | २०००/– |
| ४ | उरण नगर परिषद हद्दामध्ये विमला तलाव व नगरपरिषद कार्यालय येथे हवेचे मोजमाप करण्यासाठी हवा गुणवत्ता परिक्षण यंत्र बसविणे बाबत. | ५०००/– | २०००/– |

सदरकामाच्या अटी व शर्ती आरोग्य विभाग / स्वच्छता विभागातुन माहितीकरिता उपलब्ध असुन इच्छुकटेकेदारांनी आरोग्य विभाग प्रमुख यांचेशीसंपर्क साधावा.

**जा.क्र. उनप/आरोग्य /२१३/२०२५–२०२६**
**दिनांक :– ३०/०४/२०२५**

**सही/–**
**(समीर जाधव)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन – ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई–मेल: coud.kulgaonbadalapur @maharashtra.gov.in, वेबसाइट: kbmc.gov.in.

**जा.क्र. कुबनप/नगरोत्थान/ साबां/१४३/२०२५–२०२६** **दिनांक : २८/०४/२०२५**

**ई–निविदा सूचना क्रमांक–७/२०२५–२०२६**

कुळगांव–बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२४–२५ करिता प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या ११ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई–निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई–निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. ३०/०४/२०२५ ते दि.०८/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून दि.०२/०५/२०२५ रोजी दुपारी. १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई–निविदा दि. ०९/०५/२०२५ रोजी दुपारी. १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/–**
**(मारुती गायकवाड)**
मुख्याधिकारी तथा प्रशासक
कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S

## SMT. BHAGUBAI CHANGU THAKUR VIDYALAYA, DRONAGIRI

Plot No.60/61, Sector-12, Dronagiri, Tal. Uran, Dist. Raigad-400707

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2025-2026 (FOR SELF FINANCE PROGRAMME)**

**Full time Assistant - Teacher for the Academic Year-2025-2026. On Purely Temporary for one year basis for the following subjects.**

| Sr. No. | Section | Title Of Posts | Subject/ Section | Qualifications | No Of Posts |
|---|---|---|---|---|---|
| 01 | UPPER PRIMARY & SECONDARY | ASST. TEACHER | ENGLISH | B.A.D.Ed. | 01 |
| 02 | | ASST- TEACHER | Physical Educator | B.A. B.P.Ed. | 01 |
| | | LIBRARY ASST. | GRADUATE WITH B.LIB/M.LIB. | | 01 |
| | | SCIENCE LAB ASSISTANT | B.Sc. | | 01 |

Applications with full details (Email address & what's app no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA,** Plot no: 60/61, Sector-12, Dronagiri Node Tal: Uran. Dist: Raigad. 400 707.
Candidates may submit the application by email to **bctvidyalaya@gmail.com on** or before **10 May 2025**
If required Contact No. **1. MRS. KATHE ANURADHA (I/C HEAD MISTRESS) - 9819212918**
**2. MRS. PATIL SNEHAL-9594964872**

**Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha,Panvel.

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S

## MORU NARAYAN MHATRE VIDYALAYA, GAVHAN KOPAR

Plot No: 1, Ulwe Node, At Post: Gavhan Kopar. 410 206

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2025-2026 (FOR SELF FINANCE PROGRAMME)**

**Full time Assistant - Teacher for the Academic Year - 2025-2026. On Purely Temporary for one year basis for the following subjects.**

| Sr. No. | Section | Title of Posts | Subject/ Section | Qualifications | No of Posts |
|---|---|---|---|---|---|
| 01 | PRIMARY | LIBRARIAN | LIBRARY | B.A./B.LIB/ M.LIB | 01 |
| 02 | SECONDARY | IT LAB ASSISTANT | IT LAB | B.Sc. CS/BCA/ MCA | 01 |

Applications with full details (Email address & what's app no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA,** Plot No: 1, Ulwe Node, At Post: Gavhan, Kopar. Tal: Panvel, Dist: Raigad. 410206.
Candidates may submit the application by email to **mnmv.primary@gmail.com** on or before **10 May 2025**
If required Contact No. **1. MRS. PRANITA GOLE (I/C HEAD MISTRESS) - 9137042080**
**2. MRS. CHAITALI KADU - 9773323876**

**Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha,Panvel.

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S

## RAMSHETH THAKUR SECONDARY & HIGHER SECONDARY VIDYALAYA

Plot No: 1, SECTOR-33, Near Pethpada Metro Railway Station, Kharghar-410210

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2025-2026 (FOR SELF FINANCE PROGRAMME)**

**Full time Assistant - Teacher for the Academic Year - 2025-2026. On Purely Temporary for one year basis for the following subjects.**

| Sr. No. | Section | Title of Posts | Subject/ Section | Qualifications | No. of Posts |
|---|---|---|---|---|---|
| 01 | JR. COLLEGE | ASST. TEACHER | COMPUTER SCIENCE | M.E. MCA / M.Sc IT / M.Sc Computer Science | 01 |
| 02 | | | MATHS | M.Sc. B.Ed. | 01 |

Applications with full details (Email address & what's app no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA,** Plot No: 1, SECTOR-33, Near Pethpada Metro Railway Station, Kharghar-410210.
Candidates may submit the application by email to **principalrthsv@gmail.com** on or before **10 May 2025**
If required Contact No. **1. MRS. NISHA NAIR (I/C PRINCIPAL) -9987476532**
**2. MRS. KALYANI MHATRE-9870115721**

**Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha,Panvel.

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S

## CHANGU KANA THAKUR VIDYALAYA

Plot No. 8 Sector- 14, New Panvel, Dist. Raigad – 410206

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2025-2026**

**Full time Assistant - Teacher for the Academic Year - 2025-2026.**
**On Purely Temporary for one year basis for the following subjects.**

| SR. NO. | NAME OF THE SCHOOLS | SUBJECT / SECTION | TITLE OF POSTS | SUBJECT / SECTION | QUALIFICATIONS | NO OF POSTS |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | CHANGU KANA THAKUR VIDYALAYA ENGLISH MEDIUM NEW PANVEL. | PRE-PRIMARY | ASST-TEACHER | PRE-PRIMARY | B.Sc/B.Com/ B.A. E.C.C.Ed | 01 |
| | | | Computer Teacher | COMPUTER | B.SC. IT/BCA | 01 |
| | | SCONDARY | COUNSELLOR | | B.A. (Psychology) PGD in Child Guidance and counseling. | 01 |
| 02 | CHANGU KANA THAKUR HIGHER SECONDARY VIDYALAYA, NEW PANVEL. | HIGHER SECONARY (JR. COLLEGE) | ASST-TEACHER | ENGLISH | M.A. B.Ed. | 01 |
| | | | | MATHEMATICS | M.Sc. B.Ed | 03 |
| | | | | COMMERCE | M.Com B.Ed. | 02 |

Applications with full details (Email address & what's app no) should reach with attested xerox copies of certificates to **CHAIRMAN, JBSP SANSTHA, Plot no: 8, Sector-14, New Panvel. Tal: Panvel. Dist. Raigad. Navi Mumbai. 410206.**
Candidates may submit the application by email to **jbspsanstha1992@gmail.com** or by post on or before **10 May 2025**
If required **Contact No. 9930718675. MRS. PATANKAR SAYLEE.**

**Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha,Panvel.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व परिसंवाद, कार्यशाळा व परिषद यांच्या संयुक्त विद्यमान मंगळवारी (दि.२९) वाणिज्य व विज्ञान यांचा समन्वय : नाविन्य आणि विकासासाठी बहुविद्याशाखीय दृष्टिकोन या विषयावर आधारित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते.

या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्रात प्रमुख वक्ते डॉ. दिनेश काला, प्राचार्य आर. के. टी. महाविद्यालय, उल्हासनगर यांनी उपस्थित राहून सोलार पॅनेल एक चांगला ऊर्जा पर्याय आहे, जो स्वच्छ आणि नूतनीकरणक्षम ऊर्जा पुरवतो व ते वीज खर्च कमी करतात आणि पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी करतात या विषयी उपस्थित वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी, शिक्षक व संशोधक यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या परिषदेमध्ये पहिल्या व दुसऱ्या तांत्रिक सत्रांमध्ये विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी शिक्षक व संशोधकांनी दिलेल्या प्रमुख व उप विषयांवर संशोधन लेखाच्या माध्यमातून सादरीकरण केले यामध्ये प्रामुख्याने के.ल.ई महाविद्यालय कामोठे, छत्रपती शिवाजी विद्यापीठ पनवेल, चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल, रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर, के.एम.सी. महाविद्यालय खोपोली, कुमाऊँ विद्यापीठ, उत्तराखंड या महाविद्यालयांचा समावेश होता.

पहिल्या तांत्रिक सत्रासाठी प्रा. डॉ. गिरीश गुंड महात्मा फुले आर्ट्स कॉमर्स व सायन्स महाविद्यालय पनवेल यांनी विज्ञान शाखेतील संशोधन लेख सादरीकरणाचे परीक्षक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली तसेच संशोधकांना वेगवेगळे प्रश्न विचारून वेगवेगळ्या संशोधना संदर्भात सूचना दिल्या तसेच द्वितीय तांत्रिक सत्रासाठी प्रा. डॉ. अनया मर्कंडेय (महात्मा फुले संस्थेचे आर्ट्स, कॉमर्स व सायन्स महाविद्यालय, चेंबूर) यांनी वाणिज्य शाखेतील संशोधन लेख सादरीकरणाचे परीक्षक म्हणून कामकाज पाहिले व वेगवेगळे प्रश्न व सूचना संशोधकांना दिल्या व अभिनंदन केले. या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेमध्ये विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी व संशोधकांनी सादर केलेल्या संशोधन लेखांना प्रथम,व द्वितीय क्रमांक देण्यात आले त्यामध्ये प्रामुख्याने डॉ. शर्मिला घंगाळे (विज्ञान शाखा) चांगू काना ठाकूर महाविद्यालय, न्यू पनवेल यांना प्रथम क्रमांक व नमित भटनागर (वाणिज्य शाखा) कुमाऊँ विद्यापीठ, उत्तराखंड यांना द्वितीय क्रमांक मिळाला. या वेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे व प्रमुख वक्ते व पाहुणे यांच्या हस्ते प्राध्यापक, विद्यार्थी तसेच संशोधकांना प्रमाणपत्र देण्यात आली व त्यांचे अभिनंदन केले.

परिषदेचे आयोजन प्रा. प्रथमेश उदेकर यांनी केले तसेच या वेळी सूत्रसंचालन प्रा. तनुजा सुमन व प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, परिसंवाद कार्यशाळा व परिषद समितीतील सर्व सदस्य व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. प्रा. प्रथमेश उदेकर यांनी सर्वांचे आभार मानले. संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी गडदे यांनी या परिषदेचे आयोजन केल्याबद्दल रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

# वाशीतील पादचारी पूल खुला; नागरिकांना दिलासा

## लिफ्टही बसविण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाशी-कोपरखैरणे या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे वाशीतील वाहतूक कोंडी लक्षात घेता, या ठिकाणी पादचारी पूल नागरिकांसाठी खुला करण्यात आला असल्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. सदर ठिकाणी लिफ्टदेखील बसवावी अशी मागणी होत आहे.

वाशी सेक्टर नऊ या मार्गावर एकही पादचारी पूल नसल्याने, पादचाऱ्यांकडून ठिकठिकाणी रस्ता ओलांडण्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत होती. ही वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी नवी मुंबई महापालिकेच्या वतीने वाशीत हा पहिला पादचारी पूल बांधण्यात आला आहे.



वाशी हा खरेदीसाठी नवी मुंबईतील सर्वात मोठे डेस्टिनेशन आहे. त्यामुळे सुट्टी आणि सणासुदीच्या दिवशी तर इथे मोठ्या प्रमाणात फेरीवाले रस्त्यावर बसतात, त्यामुळे विक्रेते आणि खरेदीदार,यामुळे इथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. वाशी-कोपरखैरणे रस्त्यावर, दोन्हींदिशेला दुकाने असल्याने इथे वाहन पार्किंगचाही गोंधळ असतो. खरेदीसाठी येणाऱ्यांच्या गाड्या रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या असतात. शिवाय येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांमुळे लोकांना रस्ता ओलांडणे कठीण होते. त्यामुळं इथे पादचारी पूल उभारावा अशी नागरिकांची, पादचाऱ्यांची मागणी होती.

त्यानुसार वाशीतील पहिला पादचारी पूल निर्माण झाला आहे. या ठिकाणी २ लिफ्ट बसवण्याचे प्रयोजित असून गरोदर महिला जेष्ठ नागरिक यांच्यासाठी लिफ्ट लवकरात लवकर बसवण्यात यावी अशी मागणी होत आहे. जेष्ठ नागरिक आणि लहान मुले यांना पूल चढ - उतार करण्यास सहाय्य होणार असल्याचे भाजपचे विकास सोरटे यांनी सांगितले.

# पनवेलमध्ये जिजाऊ रथयात्रेचे स्वागत




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरात सोमवारी (दि.२८) जिजाऊ रथयात्रेचे आगमन झाले होते. ही यात्रा या यात्रेचे स्वागत करण्यासाठी रायगड जिल्ह्याचे मराठा सेवा संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या अर्धांगिनी डॉ. जयश्री पाटील तसेच त्यांचे कुटुंबीय मराठा सेवा संघाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी सर्व उपस्थितांनी मानवंदना दिली.

शिवभक्तांची तसेच १८ पगड जाती व बारा बलुतेदार समाजातील लोकांची उस्फूर्त उपस्थिती होती. यात्रेमध्ये जवळपास दीडशेपेक्षा जास्त स्त्रियांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. हृथयात्रेमध्ये जिजाऊचा पोशाख घालून घोड्यावर बसवून त्यांची रथयात्रेच्या रथासमोरील मिरवणूक काढण्यात आली. रथयात्रेसमोर संघ जवळपास ३० पेक्षा जास्त स्त्रियांनी लेझीम पथक लेझीम खेळत पनवेल एसटी स्टँड पासून शिवाजी पुतळ्यापर्यंत लेझीम खेळून मानवंदना देण्यात आली देण्यात आली व शिवाजी पुतळ्याजवळ चौकात या मिरवणुकीचे सभेत रूपांतर झाले व तिथे मराठा सेवा संघाच्या विविध नेत्यांनी मनोगत व्यक्त केले.

रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष डॉ. प्रकाश पाटील यांनी प्रस्तावना केली व शिवश्री तनपुरे साहेब साहेब तसेच या रथयात्रेचे मुख्य संयोजक आदरणीय शिवश्री सौरभ दादा खेडेकर तसेच गणेश कडू यांनी मनोगत व्यक्त केले.

यात्रा यशस्वी होण्यासाठी लाईफ लाईन हॉस्पिटलचे कर्मचारी श्री उरणकर, संजय, सकपाळ सुहास, प्रति तसेच नर्सिंग स्टाफ लिना जगदाले व ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्टाफ या सर्वांनी मेहनत घेऊन ही रथयात्रा यशस्वी केली ट्रॅफिकचे इन्स्पेक्टर संजय पाटील साहेब यांनी अतिशय उत्कृष्टपणे ट्रॅफिकचे नियोजन करून अर्थ यात्रेला कुठल्याही प्रकारची अडचण होऊ दिली नाही.

सभास्थानी सर्व नेत्यांनी डॉ. प्रकाश पाटील, तनपुरे, सौरभ खेडेकर, लेकुरवाळे सर, श्री चांदीवडे या सर्वांनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून शिव वंदना छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना दिली. पुढे ही रथयात्राची पेन येथे मार्गक्रमण झाले संध्याकाळी ही रथयात्रा महाड मुक्कामी राहून उद्या पाचाड मार्गे जिजाऊंच्या समाधीस्थळी त्यांना मानवंदना देऊन पुढे येथे रवाना होईल व पुण्यात या रथयात्रेच्या समारोप होणार आहे.

पनवेलमधील स्वागतावेळी लेकुरवाळे सर, किरण भोसले, प्रकाश चांदी वडे, प्रशांत माने, माजी नगरसेवक गणेश कडू तसेच माझी नगरसेवक दर्शना भोईर, राजाभाऊ नलावडे, कामोठ्यातून स्वप्निल काटकर, खारघरमधून सकल मराठा समाजाचे कालिदास देशमुख व त्यांचे सर्व सहकारी तसेच कळंबोलीमधून अरुण ठाकूर व त्यांच्या सहकाऱ्यांनी मानवंदना दिली.

# जासई विद्यालयाच्या मदतीसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जासई येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनियर कॉलेज या विद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी जेएनपीएच्या सीएसआर फंडातून ५० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष आणि जेएनपीएचे कामगार नेते सुरेश पाटील यांनी हा निधी मिळवण्यासाठी विशेष प्रयत्न केला.

या मदतीबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या के. जी. म्हात्रे, उपमुख्याध्यापक व्ही. के. कुटे, आणि पर्यवेक्षिका के.एस मुकादम यांनी सुरेश पाटील यांचे आभार मानले आहेत. दरम्यान, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीदेखील या इमारत बांधकामासाठी ५० लाख रुपयांची मदत केली आहे. त्याबद्दल विद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य तसेच कामगारनेते सुरेश पाटील यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आभार मानले आहेत.

दरम्यान, या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्यापदी के.जी.म्हात्रे आणि उपप्राचार्यपदी व्ही. के. कुटे यांनी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

# मंत्री उईके घेणार आदिवासींची भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके शुक्रवारी (दि.२) उरण विधानसभेतील विविध आदिवासी वाड्यांना भेट देणार आहेत. यामध्ये रानसई, सारसईमी इर्शाळवाडी, बोरगाव आदी वाड्यांची पाहणी करणार आहेत.



बागेची वाडी येथील कार्यक्रमात आदिवासी बांधवांना लोककला साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच इर्शाळवाडी पुनर्वसन येथील आदिवासी बांधवांशी ते संवाद साधणार आहेत. यावेळी त्यांच्या समवेत लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्यासह विभागातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# विद्यार्थ्यांनी चित्रांमधून दर्शविले पर्यावरण संरक्षण, संवर्धनाचे महत्त्व



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमध्ये शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्न खिल्लारे यांच्या नियंत्रणाखाली पर्यावरण समस्या व उपाययोजना या विषयावर विद्यार्थ्यांच्या मनात असलेल्या संकल्पनांना चित्राच्या रूपात अविष्कृत करण्यासाठी चित्रोत्सव हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांनी या विषयानुरूप चित्रे काढून चित्रांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन हे आपलं राष्ट्रीय कर्तव्य आहे याची जाणीव जागृती केली. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने जलप्रदूषण, वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण तसेच प्लास्टिकचा भस्मासूर, वृक्षतोड अशा पर्यावरण विषयक विविध विषयांवर चित्रे काढून वसुंधरा संरक्षण व संवर्धन याविषयी बहुमूल्य संदेश दिला.

काही शाळांतील शिक्षकांनी आपल्या शालेय परिसरात विद्यार्थ्यांना नेऊन नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत स्वच्छ भारत अभियानांतर्गत आकर्षक चित्रे काढलेली आहेत, ती शहर सुशोभिकरणामध्ये काढलेली चित्रे विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली व त्यावर चर्चा घडवून आणण्यात आली. या उपक्रमात काही ठिकाणी शिक्षक, विद्यार्थ्यांसह पालक व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्यही उपस्थित होते.

प्लास्टिक बंदी, पाण्याचा आवश्यकतेइतकाच वापर करणे, घरातील सुक्या कचऱ्याचा पुनर्वापर करणे याबाबतही उपस्थित ज्येष्ठ नागरिकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वसुंधरेचे रक्षण हे आपल्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे याची प्रचिती विद्यार्थ्यांनी स्वतः चित्रे रेखाटून प्रदर्शित करीत वसुंधरा अभियानातील हा उपक्रम यशस्वी केला.




# रायगड जिल्ह्यात शुभमुहूर्तावर बालविवाह रोखण्यासाठी प्रशासनाची खबरदारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये विशेषतः अक्षय तृतीयेसारख्या शुभमुहूर्तावर बालविवाहांचे प्रमाण वाढते. त्यामुळे जिल्ह्यात यंदा बालविवाह होऊ नये म्हणून सर्व संबंधित यंत्रणांना खबरादारी बाळगण्याच्या सूचना अपर जिल्हादंडाधिकारीसुनील थोरवे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीत दिल्या होत्या.



विविध यंत्रणांनी आतापर्यंत घेतलेल्या उपाययोजनांचा आढावा ही घेण्यात आला. बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अन्वये मुलीचे वय १८ वर्षे व मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण असावे लागते. अन्यथा संबंधितांवर एक लाख रुपये दंड व दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा होऊ शकते. विवाह सोहळ्यात सहभागी पुरोहित, मंडप व्यावसायिक, वर-वधूंचे पालक, तसेच ग्रामसेवक, पोलीस पाटील, सरपंच यांच्यावरही कारवाईची तरतूद आहे.

अक्षय तृतीया सण दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी असल्याने त्यादिवशी विशेषतः धार्मिक स्थळे, मंगल कार्यालये, बीचवरील हॉटेल्स यावर लक्ष ठेवण्यात येईल. गावांमध्ये विवाह कार्यक्रम होत असल्यास सरपंच, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका आणि ग्रामसेवक यांनी मुला-मुलींच्या वयाची शहानिशा करावी, असे आदेश अपर जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात आले होते.

ग्राम बाल संरक्षण समित्यांच्या माध्यमातून बालकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात. आदिवासी प्रकल्प विभागाला किशोरवयीन मुलामुलींची माहिती घेऊन स्थानिक यंत्रणांना पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या.

रायगड जिल्ह्यातील पेण, पनवेल, उरण, सुधागड पाली आणि कर्जत तालुक्यात विशेष लक्ष देण्यात आले असून, गावांमध्ये बैठका घेऊन बालविवाह प्रतिबंधासाठी प्रभावी पावले उचलली जाणार आहेत. बालविवाहासारख्या अघोरी प्रथेला आळा घालण्यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे आणि रायगड जिल्ह्याला बालविवाहमुक्त करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी १०९८ या टोल फ्री क्रमांक माहिती द्यावी. या क्रमांकावर माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

# खालापुर हत्याकांडातील आरोपीस उत्तरप्रदेशातुन अटक

**खालापुर, अलिबाग : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाणे हद्दीत २६ एप्रिल रोजी मौजे नावंढेगावच्या हद्दीत खोपोली कर्जत रेल्वे लाईन कि.मी स्टोन क्र.१०७/४ चे ब्रिजजवळ अनोळखी पुरुषाच्या डोक्यात हत्याराने जखम करून त्यास ठार मारून पुरावा नष्ट करण्यासाठी त्याचेवर दगड रचून ठेवले होते म्हणून खालापूर पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर आरोपीला उत्तरप्रदेशातुन अटक करण्यात आले.

उपरोक्त गुन्हयाचा समांतर तपास करण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांनी सहा.पोलीस निरीक्षक नागेश कदम, पोलीस उपनिरीक्षक लिंगप्पा सरगर व१२ अंमलदार यांचे दोन पथक तयार करण्यात आले सदर दोन्ही पथकांनी सदर गुन्हयाचा समांतरतपास केला. सदर पथकानी आपले कौशल्य पणाला लावुन तांत्रिक तपास केला तसेच गोपनीयमाहीती प्राप्त केली.

तांत्रिक तपासामधुन सदर गुन्हयातील संशयीत इसम जि.उन्नाव उत्तरप्रदेश येथेअसल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीस उपनिरीक्षक लिंगप्पा सरगर व ४ अंमलदार यांना तात्काळ रवाना करण्यात आले. सदर पथकाने तांत्रिक तपासात निष्पन्नझालेला संशियत इसम लवकुश राजा पासवान वय-२४, रा.कुलाहा ता.हसनगंज जि.उन्नाउत्तरप्रदेश यास त्याचे राहते गावातुन ताब्यात घेतले.

सदर इसमाकडे गुन्हयाबाबत चौकशी केली परंतु तो उपयुक्त माहीती देत नव्हता परंतु तांत्रिक तपासामध्ये त्याचा सहभाग निष्पन्न होत असल्याने त्यास पुढील चौकशीकामी ताब्यात घेवुन अलिबाग येथे आणण्यात आले.स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे, सहा. पोलीसनिरीक्षक नागेश कदम, पोलीस उपनिरीक्षक लिंगप्पा सरगर यांनी त्याचेकडे कौशल्याने चौकशी केली. असता आरोपीने अखेर गुन्हयाची कबुली दिली.

मयत सुभाष त्रिलोकब्रिजविष्वकर्मा हा गोदरेज कंपनी खालापुर येथे कामांस असुन आरोपी याचेशेजारी गेले ४ ते ५ दिवसांपुर्वी राहण्यास होता. त्या दोघांची ओळख झाल्याने मयत सुभाष हा आरोपीत याचेकडे राहण्यास आला होता. दिनांक २२एप्रिल रोजी मयत व आरोपी यांनी नशापान केले. त्यानंतर काही कारणावरून दोघांमध्ये शिवीगाळ व बाचाबाचीझाली. आरोपीने त्याला खाली पाडुन जवळच असलेला मोठा दगड घेवुन छातीवर व डोक्यावर मारून त्याचा खुन केला व त्याचा मृतदेह दिसुन येवु नये म्हणुन त्याचे मृतदेहावर दगड ठेवुन झाकुन ठेवुन तो त्या ठिकाणावरून पसार झाला त्यानंतर तो रेल्वेने त्याचेमुळगावी उत्तरप्रदेश येथे निघुन गेला.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांचे मार्गदर्शनात पोलीसनिरीक्षक बाळासाहेब खाडे स्थानिक गुन्हे शाखा तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि नागेश कदम,पोलीस उपनिरीक्षक लिंगाप्पा सरगर, सहा.पोलीस उपनिरीक्षक संदिप पाटील, सहा.पोलीसउपनिरीक्षक प्रसाद पाटील, पोह प्रतिक सावंत,राकेश म्हात्रे,सुधीर मोरे, रविंद्र मुढें,अक्षय जाधव, जितेंद्र चव्हाण, अक्षय पाटील, पोशी तुशार कवळे यांनी केली आहे.

# अंबा नदी पुलाजवळ वैद्यकीय कचऱ्याचा खच, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

वाकण पाली राज्य महामार्गावर पालीतील अंबा नदी पुलाजवळ मोठ्या प्रमाणावर इंजेक्शन, सलाईन, नळ्या, इंजेक्शनच्या रिकाम्या बाटल्या, इंजेक्शन सुई व इतर वैद्यकीय कचरा सोमवारी (ता. २८) सायंकाळी पडलेला आढळून आला आहे. ही घटना समोर येताच स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, आरोग्य आणि पर्यावरणाच्या दृष्टीने गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

हा वैद्यकीय कचरा अज्ञात व्यक्तींनी अंबा नदी पुलाजवळ रस्त्यावर फेकून दिला आहे. या परिसरातून वाहने, प्रवासी, नागरिक व गुरेढोरे ये-जा करतात. परिणामी या कचऱ्यामुळे संसर्गजन्य रोग पसरण्याचा तसेच इंजेक्शन सुई व काचेच्या बाटल्या पायात घुसून जखमी होण्याचा धोका वाढला आहे. एखाद्या वाहनाचा टायर देखील पंक्चर होऊ शकतो. विशेषतः पावसाळ्याच्या तोंडावर असे कचरे उघड्यावर टाकले जाणे अत्यंत घातक ठरू शकते, कारण पावसामुळे हे दूषित पदार्थ नदी पाण्यात मिसळून जलप्रदूषण घडवू शकतात.

स्थानिक नागरिकांनी याबाबत संताप व्यक्त करत प्रशासनावर हलगर्जीपणाचा आरोप केला आहे. सार्वजनिक ठिकाणी असा कचरा फेकणे म्हणजे जनतेच्या आरोग्याशी खेळण्यासारखे आहे. हे नेमके कोणत्या हॉस्पिटलमधून किंवा क्लिनिकमधून आले, याची चौकशी करावी,अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.या घटनेची माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर शशिकांत मढवी यांना देण्यात आली. मात्र त्यांनी सांगितले की येथे टाकण्यात आलेला कचरा हा आमच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा किंवा उपकेंद्राचा नाही. आमच्या इथे कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यात येते.

# मुरुडमध्ये दहशतवादविरोधी निषेध मोर्चा

**मुरूड : प्रतिनिधी**

पहलगाम येथे झालेल्या भ्याड आणि अमानुष दहशतवादी पाकिस्तानच्या हल्ल्यात निष्पाप २८पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाले असून अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत याचा केंद्र सरकारने बदला घेऊन पाकीस्तान मध्ये घुसून दहशतवादी अतिरेक्यांना यांना संपवा मुरूड तालुका सकल हिंदू समाजाचा आवाज कडकडला पाकिस्तान मुर्दाबाद घोषणा यावेळी देण्यात आले.




मुरूड तालुका सकल हिंदू समाजाच्या वतीने मंगळवारी मुरूड तहसीलदार कार्यालयात जाऊन नायब तहसीलदार राजेश्री दळवी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की पहेलगाम, काश्मीर येथे मुस्लीम जिहादी आंतकवायानी निरपराध पर्यटकांना नाव व धर्म विचारून हिंदू असल्याची खात्री करूनच २८ हिंदूना क्रूरतेने ठार केले. तसेच अनेक हिंदू पर्यटक गंभीर जखमी झाले आहेत. मुंबई आतंकवादी हल्ला, अक्षरधाम मंदिरावरील हल्ला, पुलथामा उरी सारखे सैन्य दलावरील हल्ले इतकेच काय तर प्रत्यक्ष भारतीय संसदेवरील हल्ला असे अनेक हल्ले पाकिस्तान पुरस्कृत मुस्लिम दहशतवाद्यांनी आजवर घडवून आणले आहेत, परंतु आता धर्म विचारून हत्या करण्यापर्यंत या अतिरेक्यांची मजल गेली आहे. अशा धार्मिक जिहादी दहशतवादाचा सरकारने समूळ बिमोड करावा असा सकल हिंदू समाज म्हणून आम्हा सर्वांचा आग्रह आहे.

हिंदू समाज म्हणून आमच्या भावना याविषयी आता अतिशय तीव्र व संवेदनशील झाल्या आहेत. या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी केंद्र सरकारने कडक पावले उचलावीत व अशा दहशतवादाचा समूळ बिमोड करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. केंद्र सरकार जी पावले उचलेल त्याला मुरुड तालुक्याच्या सकल हिंदू समाजाचा पाठिंबा असणार आहे.असे या निवेदनात म्हटलं आहे.

तहसीलदार कार्यालया पासून दरबार रोड, गणेश आळी, नगरपरिषद कार्यालय, मुरूड बाजारपेठ पायी रॅली काढण्यात आली.या रॅलीत शेकडो मुरुड हिंदू सकल समाजाचे नागरिकांनी हिंदू धर्म की जय,भारत माता की जय,जय भवानी जय शिवाजी हर हर महादेव धर्मवीर संभाजी महाराज की जय असा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.शेवटी आझाद चौकात येथे येऊन पहलगाम झालेल्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाले त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

# सेवेचा अधिकार देणारा कायदा सामान्य जनतेला फायदेशीर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्यातील नागरिकांना प्रशासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा या ठरावीक मुदतीत मिळवण्याचा हक्क मिळवून देणारा कायदा म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५. या कायद्यामुळे राज्यातील नागरिकांना पारदर्शक, गतिमान आणि कालबद्ध सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.



नियोजन भवन येथे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ दशकपूर्ती आणि प्रथम 'सेवा हक्क दिन' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी `. व्यासपीठावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, डॉ रविंद्र शेळके,जिल्हा नियोजन अधिकारी ज.द.मेहत्रे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव,यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक सेवा देणाऱ्या अधिकारी व कार्यालयाचा गौरव करण्यात आला. महसूल विभागाने या अंतर्गत सर्वाधिक ९४.३६% सेवा दिल्या आहेत. तर उद्योग विभागाने ९४.१२ आणि कामगार विभागाने ९३.५३ टक्के सेवा दिल्या आहेत. यावेळी अतिउत्तम कामगिरी करणारे तहसीलदार मुरुड, माणगाव, अलिबाग यांचा प्रशस्तीपत्र आणि स्मृती चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात आले.

जिल्हाधिकारी यांनी उपस्थित सर्वांना लोकसेवा हमीची शपथ दिली.या कायद्याविषयी माहिती देणाऱ्या संदेशाचे लोकार्पण केले.

# तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**मुरुड: प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड येथे तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. साजिद शेख यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पदव्युत्तर शिक्षण घेण्याचे तसेच विविध स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करण्याचे आवाहन केले.

महाविद्यालयाचे अध्यक्ष जैनुद्दीन कादरी यांनीही विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी उत्तम नागरिक होऊन समाजसेवेची भावना जपत जीवनात यशस्वी होण्याचा संदेश विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या आठवणींना उजाळा देत आपली मनोगते व्यक्त केली आणि सर्व शिक्षकवर्गाबद्दल आभार मानले. तसेच महाविद्यालयातर्फे देण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक सुविधा व सामाजिक स्फूर्ती याचा विशेष उल्लेख विद्यार्थ्यांमार्फत करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयेशा दळवी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक प्राध्यापक प्रा. निदा गोर्मे आणि महाविद्यालयातील सर्व अध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रमपूर्वक योगदान दिले. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हा निरोप समारंभ संस्मरणीय ठरला

# जेएसएम कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांचे गेट टु गेदर

**रेवदंडा: प्रतिनिधी**

अनेक वर्षानी एकत्रीत येत,महाविदयालयीन जीवनातील आठवणीना वर्ग मित्रमैत्रीणी समवेत पुनस्यः उजाला देत, आयुष्यातील स्मरणीय दिवसातील घेवाण देवाण करण्याचा सुयोग ऋषीकांत भगत यांचे प्रयत्नाने घडला, लोणावळा येथील गुरूकृपा बंगल्यामध्ये जे.एस.एम. कॉलेजच्या बी.ए. मधील १९९७ बॅचने गेट टूगेदर केले.

तब्बल २८ वर्षानी एकत्रीत येवून कॉलेज जीवनातील आठवणी व आयुष्यातील सुख दुखाचे अनुभव एकमेकांना शेअर केले, कॉलेज जीवनानंतर यामध्ये काही मित्र सामाजीक क्षेत्रात राजकीय पदावर, काही बँकेत, कोर्टात, व विविध क्षेत्रात कार्यरत आहेत.

यामध्ये ऋषीकांत भगत, विदयुत बारस्कर, अजित म्हात्रे, शैलेश म्हात्रे, नंदन पाटील, वैभव दळवी, शिल्पा मगर, विशाल पाटील, दिपाली भोसले,मनिषा भोईटे,पुजा राउत, वैशाली भोईर, संपदा मळेकर, उमेश म्हात्रे, शैलेश चव्हाण, लिलाधर गोंधळी, जयेंद्र वालेकर, अंजली गुडेकर, दिपा हुजरे, श्रावणी मोरे, निशांत होळकर, प्रिती वाणी, तृप्ती घरत आदीचा सहभाग होता.



# 'आपल्या पाल्याची काळजी प्रशासनासह पालकांनीदेखील घ्यावी'

**चौक,: प्रतिनिधी**

शाळांमधील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांची सुरक्षा विषयी काळजी शाळा प्रशासन यांच्या बरोबर पालकांनी देखील घ्यावी, असे आवाहन खालापूर उप विभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी केले आहे.



राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थिनींच्या सुरक्षा विषयक उपाय योजनांची परिपूर्णरीतीने अमंलबजावणी करण्याबाबत खालापूर तालुक्यातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक यांची बैठक गट शिक्षण अधिकारी कैलास चोरमले यांनी खालापूर येथील स्वामी विवेकानंद शाळेत आयोजित केली होती, त्या प्रसंगी उप विभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम बोलत होते.

सद्या लहान विद्यार्थी यांची सुरक्षा ऐरणीवर आली आहे. शाळेत आपली मुले शिक्षण घेतात त्या शाळेत भेट देणे तेथील उपाययोजना तसेच ज्या स्कूल बस मधून प्रवास करतात त्या वाहन चालक, वाहक यांची चारित्र्य तपासणी होणे आणि महिला वाहक असणे आवश्यक आहे. यावेळी शाळा व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, ते कॅमेरे सुरक्षित व स्थिती मध्ये असणे आवश्यक आहे. सीसीटीव्ही फुटेज पाहणे, त्याचा बॅकअप ठेवणे, शालेय कर्मचारी, स्कूल बस चालक वाहक यांची तपासणी करणे, शाळेत तक्रार पेटी असणे आणि ती उघडून बघणे, सखी सावित्री समिती बाबत तरतुदींचे अनुकरण करणे, विद्यार्थी सुरक्षा समिती स्थानिक पातळीवर गठित करणे, अशा अनेक महत्वाच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी सर्व शाळांमधील मुख्याध्यापक बैठकीला उपस्थित होते. यावेळी उप विभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी सर्व मुख्याध्यापक यांना पोलीसांबरोबरच अनेक महत्वाचे फोन क्रमांक दिले.

# भानंग, अडनाळे भागातील कोकमाला मागणी

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील भानंग व अडनाळे विभाग हा कोकमाचे पिक घेण्यासाठी प्रसिध्द असून या भागातील डोंगराळ राहाटींमधे ही कोकमाची झाडे असून आता कोकम बहरण्यास सुरवात झाली असून येथील कोकमाला बाजारात चांगली मागणी होत आहे.

भानंग, अडनाळे तसेच तळेगाव, गायमुख, मालुक या भागातही कोकम चांगल्या प्रकारे होत आहेत. या कोकमाचा आकार व कोकमातील रसाची चव ही वेगळीच असून या चवदार कोकमाला मागणी अधिक होत आहे.उन्हाळ्यात कोकम रस अधिक प्रमाणात तयार केले जाते.या रसामुळे उन्हाळ्यात आरोग्यास फायदा होतो,तसेच कोकम रस हे औषधी म्हणून वापरण्यात येतो.या भागात दहा वर्षापूर्वी प्रत्येक शेतकऱ्यांची चार ते पाच कोकमाची झाडे असायचीच चांगले उत्पन्न मिळत असे. मात्र आता या कोकमाच्या झाडांची संख्या कमी झाल्याचे पहावयास मिळत आहे.



या भागात आजही शेतकऱ्यांनी कोकमाचे पिक काढल्यास त्यांतून चांगला अर्थिक लाभ मिळेल.एवढ्या चांगल्या पध्दतीने मोठे उत्पन्न देणारी ही कोकम आहेत.शेतकऱ्यांनी हे पिक काढण्यासाठी पुढाकार घेऊन फक्त कोकमाची झाडे जंगलातील शेतीत लावावीत ती जगवावीत ती जगली की चार पाच वर्षांत उत्पन्नाला सुरवात होते. खर्च कमी व उत्पन्न जास्त अशी ही एक बागायती शेती येथील खडकाळ व डोंगराळ जमिनीवर सहज करता येईल, असे जाणकार म्हणत आहेत.

# कोलकाताचा दिल्लीवर दमदार विजय

**दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५ स्पर्धेतील ४८ वा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये झाला. हा सामना कोलकाता नाईट रायडर्स संघासाठी अतिशय महत्त्वाचा होता. कारण प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी कोलकाता नाईट रायडर्सला हा सामना कुठल्याही परिस्थितीत जिंकायचा होता. या सामन्यात सुनील नरेन दिल्लीच्या खेळाडूंवर भारी पडला. हा सामना कोलकाताने १४ धावांनी आपल्या नावावर केला आहे.

कोलकाता नाईट रायडर्सने या सामन्यातील पहिल्या डावात २०४ धावा केल्या होत्या. दिल्ली कॅपिटल्सला हा सामना जिंकण्यासाठी २०५ धावा करायच्या होत्या.



कर्णधार अक्षर पटेलने दिल्लीला विजय मिळवून देण्यात पूर्ण जोर लावला. त्याने गोलंदाजी करताना २ गडी बाद केले. तर फलंदाजी करताना ४३ धावा चोपल्या. शेवटी आशुतोष शर्मा आणि विपराज निगमने जोर लावला. मात्र, ते संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरले.

या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कोलकाताकडून डावाची सुरुवात करताना रहमानुल्लाह गुरबाजने २६ धावांची खेळी केली. तर सुनील नरेनने २७ धावा चोपल्या. अजिंक्य रहाणेने २६ धावांची खेळी केली. अंगकृश रघुवंशीने ४४ धावा चोपल्या. शेवटी रिंकू सिंगने ३६ धावा चोपल्या. यासह कोलकाता नाईट रायडर्सने ९ गडी बाद २०४ धावांचा डोंगर उभारला.

### केकेआरचे आव्हान कायम

कोलकाता नाईट रायडर्स संघासाठी हा सामना जिंकणं अतिशय महत्वाचा होता. प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी कोलकाताला हा सामना जिंकायचा होता. दिल्लीला पराभूत करून कोलकाताने ९ गुणांची कमाई केली आहे. यासह कोलकाताचा संघ सातव्या स्थानी कायम आहे.

## रेवदंड्यातील अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेत जय हनुमान सहाणगोटी संघ प्रथम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा यंग स्टार बॉईज चषक २०२५ आयोजित अंडरआर्म क्रिकेट ओपन स्पर्धेत सहाण गोटी संघ प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला, तर व्दितीय क्रमांक यंग स्टार बॉईज रेवदंडा, तृतीय क्रमांक मनवीर स्पोर्टस् अलिबाग या संघानी पटकाविले. स्पर्धेत उत्कृष्ट गोलदांज जीशान मनवीर अलिबाग, उत्कृष्ट फलदांज राहूल जमादार यंग स्टार बॉईज रेवदंडा, मॅन ऑफ द सिरीज जय हनुमान सहाण गोटी संघाचा केदार यांनी पटकाविले.



रेवदंडा हरेश्वर मैदानात २७ एप्रिल रोजी झालेल्या टेनिस बॉल अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेत प्रथम क्रमांकास रूपये १० हजार रोख व चषक, द्वितीय क्रमांकास रूपये पाच हजार रोख व चषक, तृतीय क्रमांकास रूपये तीन हजार रोख व भव्य चषक मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आले.

या स्पर्धेत एकूण २४ संघानी सहभाग नोंदविला होता, स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी गौरव वडके, रोशन सांरग, प्रथमेश बनिया, शुभम शेळके, प्रतिक बनिया यांनी विशेष परिश्रम घेतले.

## तळाघर येथे जिल्हा कबड्डी स्पर्धेत मेढेखार संघाची बाजी

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसियनच्या मान्यतेने नव तरुण क्रीडा मंडळ तळाघर यांनी आमदार अनिकेत भाई तटकरे आमदार चषक ४०+ वयोगटातील मर्यादित कबड्डी जिल्हास्तरीय सामन्याचे आयोजन केले होते. या स्पर्धे त रायगड जिल्हयातील नामवंत २४ संघानी सहभाग घेतला होता तर अंतिग लढत हि ओमकार वेश्वी विरुद्ध ग्रामस्य मंडळ मेंढेखार या दोन उभय संघामध्ये चुरशीची लढत प्रेक्षकांना पाहायला मिळाली. या अटीतटीच्या लढतीमध्ये मेंढेखार संघाकडून पक्कडी चढाईचा नमूना पेश करित अंतिम सामन्यात विजय संपादित करून प्रथम क्रमांक पटकाविले.



या स्पर्थेला भेंट देण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या महिला व बाळ विकास मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, संजय मोकल रायगड जिल्हा कबड्डी संघाचे प्रशिक्षक यांनी भेट देऊन स्पर्धेला शुभेच्या दिल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, विठ्ठल मोरे बळीराजा फाउंडेशन अध्यक्ष, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, अनिल भगत, सुरेश मगर, माजी सरपंच अमित मोहिते, दत्ता चव्हाण, शंकर भगत, दिपिका चिपळुणकर, हरिश्चंद्र मोरे नथुराम माने, प्रीतम पाटील, माजी सरपंच सतिश भगत आदी उपस्थित होते.

नवतरुण क्रिडा मंडळ व ग्रामस्थ तळाघर रोहा ४०+ आयोजित जिल्हास्तरीय भव्य दिव्य कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक ग्रामस्थ मंडळ मेढेखार, द्वितीय क्रमांक ओंकार वेश्वि, तृतीय क्रमांक जय भवानी वाशी–रोहा, चतुर्थ क्रमांक चिंतामणी नागाव बंदर त्या सर्व संघांना रोख रक्कम देऊन गौरवण्यात आले. तर सर्वो त्कृष्ठ खेळाडू स्वागत ठाकूर–(मेढेखार), उत्कृष्ट चढाई संदीप कोराणे –(वेश्वि), उत्कृष्ठ पक्कड सहादेव बर्डे–(वाशी), पब्लिक हिरो पदमाकर म्हात्रे (मेढेखार) या खेळाडूंना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले तर स्पर्धेचे समालोचक म्हणून रुपेश डाकी धावते समालोचन केले.

## टी–२० मुंबई लीगसाठी आयकॉन खेळाडूंची घोषणा

### सूर्यकुमार, श्रेयससह १० जणांचा समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय टी–२० क्रिकेट संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर आणि अजिंक्य रहाणे यांच्यासह अन्य आठ भारतीय खेळाडूंचा मुंबई लीग २०२५साठी आयकॉन खेळाडूंच्या यादीत समावेश करण्यात आला. मुंबई क्रिकेट असोसिएशनने या टी–२० लीगसाठी आयकॉन खेळाडूंची यादी जाहीर केली.



सहा वर्षांच्या अंतरानंतर टी–२० मुंबई लीगचे पुनरागमन होत आहे. या लीगचे तिसरे सत्र २६ मे ते ८ जूनदरम्यान वानखेडे स्टेडियमवर आयोजित केले जाईल. सूर्यकुमार, रहाणे आणि श्रेयस यांच्याशिवाय आयकॉन खेळाडूंमध्ये सरफराज खान, शार्दुल ठाकूर, पृथ्वी शॉ, शिवम दुबे आणि तुषार देशपांडे यांचेही नाव आहे.

एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक म्हणाले की, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मुंबईला अभिमान वाटणाऱ्या आठ आयकॉन खेळाडूंची घोषणा करताना आम्हाला आनंद होत आहे, जे मुंबई क्रिकेटच्या वारशाचे प्रतिनिधित्व करतात. त्यांची उपस्थिती केवळ उदयोन्मुख खेळाडूंना प्रेरणा आणि मार्गदर्शन करणार नाही, तर त्यांना शिकण्याची उत्तम संधीदेखील प्रदान करेल. एमसीए लवकरच लिलावाची तारीख जाहीर करेल. या टी–२० लीगमध्ये आठ फ्रँचायझी संघ सहभागी होतील, अशी माहिती देण्यात आली.




## वैभव, आयुष, प्रियांश इंग्लंड दौऱ्यावर जाणार?

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५मध्ये भारताच्या अनकॅप्ड युवा खेळाडूंनी आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. यामध्ये १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी आहे, तर १७ वर्षीय आयुष म्हात्रे आणि ३४ वर्षीय प्रियांश आर्य यांचा समावेश आहे. या खेळाडूंनी आपल्या कामगिरीची छाप पाडली आहे. दरम्यान आयपीएलनंतर होणाऱ्या इंग्लंड दौऱ्यासाठी या खेळाडूंची निवड होण्याची शक्यता आहे.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांची मालिका जूनमध्ये सुरू होणार आहे. यासाठी टीम इंडिया इंग्लंडचा दौरा करणार आहे. त्याचवेळी भारताचा अ संघदेखील इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. समोर आलेल्या माहितीनुसार आयपीएलनंतर भारताचा अंडर–१९ संघही इंग्लंडचा दौरा करणार आहे. संघ तिथे पाच एकदिवसीय सामने आणि दोन कसोटी सामने खेळेल.

बीसीसीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार संघ २१ जून रोजी ब्रिटनला पोहचेल. यादरम्यान भारतीय महिला संघ आणि भारतीय मिस्क्ड दिव्यांग संघदेखील इंग्लंड दौऱ्यावर असतील. या हंगामात चमकदार कामगिरी करणाऱ्या काही आयपीएल स्टार्सना अंडर–१९ संघात संधी मिळण्याची शक्यता आहे.

## सुष्मिता देशमुख, राजेश लांजेकर पॉवरलिफ्टिंग स्पर्धेचे विजेते



**ठाणे : प्रतिनिधी**

ठाणे जिल्हा पॉवरलिफ्टिंग असोसिएशन आयोजित जिल्हास्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा जीवनदीप महाविद्यालय गोवेलीच्या सहकार्याने नुकतीच महाविद्यालयाच्या प्रांगणात झाली. पुरुष गटात राजेश लांजेकर याने व महिला गटात सुश्मिता देशमुख हिने स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट स्पर्धक होण्याचा बहुमान मिळविला.

स्पर्धेचे उद्घाटन जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते अनंत चाळके, निवृत्त नौदल अधिकारी दत्तात्रय उतेकर, ठाणे पॉवरलिफ्टिंग अध्यक्ष नितीन कुडाळकर, सरचिटणीस नवनाथ गायकर, माजी सरचिटणीस आणि आंतरराष्ट्रीय मास्टर्स खेळाडू देवदत्त भोईर, माजी अध्यक्ष विनायक कारभारी, प्रशांत दुमडे, अमोल कडूसकर, सुरेश चेडे, पालघर जिल्हा सरचिटणीस रवींद्रनाथ गायकर, जीवनदीप महाविद्यालयाचे क्रीडा संचालक मोहनीश देशमुख व इतरांच्या उपस्थितीत झाले.

पुरुष गटात एनर्जीया जिम ठाणे यांनी ६० गुण मिळवून सांघिक विजेतेपद पटकावले, तर महिला गटात द युनायटेड स्पोर्ट्स क्लब ठाणे यांनी ४५ गुण मिळवून विजेतेतेपद जिंकले. स्पर्धेत विजयी झालेल्या खेळाडूंची निवड पुढील महिन्यात होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ठाणे जिल्ह्याच्या संघात झाली आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com